रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २३२
www.ramprahar.com

शनिवार, ९ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग

पनवेलच्या ग्रामीण भागात विकासकामांचा धडाका/३

'छत्रपती शिवरायांच्या प्रेरणेने महायुतीचे सरकार कार्यरत'/७

इंग्लंड विरुद्ध भारत दमदार फलंदाजीने आघाडीवर/८

## महिला दिनी भेट! घरगुती गॅस सिलिंडर १०० रुपयांनी स्वस्त



**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील महिलांना मोठी भेट दिली आहे. महिलांना घरगुती गॅस सिलिंडरवर १०० रुपयांची सवलत दिली जाईल, अशी घोषणा त्यांनी केली आहे. पीएम मोदींनी ट्विट (एक्स) केले की, 'महिला दिनानिमित्त आम्ही एलपीजी सिलिंडरच्या किमतीत १०० रुपयांची सूट देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. यामुळे महिला शक्तीचे जीवन तर सुसह्य होईलच शिवाय कोट्यवधी कुटुंबांचा आर्थिक भारही कमी होईल. हे पाऊल पर्यावरण रक्षणासाठीही उपयुक्त ठरेल, ज्यामुळे संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य सुधारेल. तसेच नवी दिल्लीच्या भारत मंडपम येथे कार्यक्रमापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण झाले. या वेळी त्यांनी गॅस सिलिंडरची किंमत १०० रुपयांनी कमी करण्यात आली असल्याचे सांगितले.

# महिलांचा सर्वंकष विकास साधणारे धोरण जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी राज्याचे चौथे महिला धोरण जाहीर केले. राज्यातील महिलांचा सर्वंकष विकास साधणाऱ्या या धोरणाचे सर्वांकडून स्वागत होत आहे.



महिला धोरणात, खासगी कंपन्यांमध्ये मातृत्व आणि पितृत्व रजेचा प्रस्ताव आहे. तसेच सरकारी आणि खासगी क्षेत्रातील कंपन्यांमध्ये गर्भवती महिलांसाठी घरून कामाला प्रोत्साहन देण्याची शिफारस या धोरणात करण्यात आली आहे.

**कागदोपत्री आईचेही नाव लागणार**

आतापर्यंत मुलांच्या नावापुढे वडिलांचे नाव लावले जात होते. यापुढे अधिकृत कागदपत्रांवरही आई नाव लावण्याची पद्धत सुरू होणार आहे. **(पान २ वर..)**

### पेन्शनचे समान विभाजन

कामगाराच्या पेन्शनचे मृत्यूनंतर आई-वडील आणि पत्नी यांच्यात समान विभाजन करण्याची शिफारसही यात करण्यात आली आहे. शाळेत जाणाऱ्या आदिवासी मुलींमधील गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी, या मुलींना शिक्षणात प्रवेश मिळण्यासाठी आर्थिक मदतीची तरतूद यंदाच्या महिला धोरणामध्ये करण्यात आली आहे.

### ऊसतोड महिलांसाठी विशेष तरतूद

ऊसतोड महिला कामगारांसाठी विशेष तरतूदी यंदाच्या महिला धोरणात करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये मासिक पाळीत ऊसतोडणीत गुंतलेल्या महिलांसाठी पगारी रजेची तरतूद मात्र करण्यात आली आहे. महिलांना त्यांच्या मासिक पाळीच्या काळातही शेतात काम करावे लागत असल्याच्या तक्रारी आल्याने याचा समावेश करण्यात आला आहे, असे महिला व बालविकास मंत्रालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### केंद्र व राज्य शासनाच्या योजनांमुळे महिला सक्षम - मुख्यमंत्री शिंदे

**कोल्हापूर :** येथील महिला मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिला धोरणाविषयी माहिती दिली. ते म्हणाले की, या धोरणात महिलांना प्रशासकीय व अर्थिक पाठबळ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महिला शेतकरी, शेतमजूर, उत्पादक संस्थांची स्थापना करून उत्पादक ते ग्राहक अशी एक मूल्य साखळी निर्माण करण्याचा निर्णय घेतला. जिल्हा प्रशासनाला महिलांनी तयार केलेल्या वस्तूंसाठी उत्पादन, ब्रँडींग, विक्रीसाठी मदत करण्याच्या सूचना देऊन महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी व पीडीतांसाठी समुपदेशन करण्याबाबत निर्णय घेतले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत चार कोटी महिलांच्या आरोग्य तपासण्या केल्या. महिलांना समानतेच्या वाटेवर आणण्याचे काम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले. केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजनातून महिलांना सक्षम केले जात आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.



# शेतकऱ्यांना त्रासदायक असा प्रकल्प रायगडात येणार नाही -पालकमंत्री सामंत

## पनवेल औद्योगिक वसाहतींमध्ये विविध कामांचा शुभारंभ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्याचा औद्योगिक दृष्टीने तसेच सर्वांगीण विकास करतांना शेतकऱ्यांना त्रास होईल, असा कुठलाही प्रकल्प रायगड जिल्ह्यात येणार नाही, असे आश्वासन उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत यांनी दिले.

पनवेल औद्योगिक सहकारी वसाहतीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने पायाभूत सुविधा विकास प्रकल्प अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मार्फत अंमलबजावणी होणाऱ्या रस्ते, गटारे, ड्रेनेज सिस्टीम, पाणीपुरवठा अशा सुविधा कामाचा शुभारंभ आणि भूमिपूजन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते आणि खासदार श्रीरंग बारणे आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. ७) झाले.

दरम्यान, पनवेल सहकारी औद्योगिक वसाहतीतील तिसऱ्या पिढीतील उद्योजक आणि महिला उद्योजक यांचा उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी त्यांनी पायाभूत सुविधांच्या विकास प्रकल्पाबाबत पनवेल औद्योगिक वसाहत ही सर्वात जुनी वसाहत असल्यामुळे प्रथम प्राधान्याने हा प्रकल्प आम्ही मंजूर केला असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे उद्योजकांच्या अडीअडचणी सोडविण्याविषयी त्यांनी विचार व्यक्त केले.

या वेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, पनवेल वसाहतीचे चेअरमन विजय लोखंडे, उपाध्यक्ष सुषमा पुरोहित, उद्योग विभागातर्फे कोकण सहसंचालक विजू शिरसाठ, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र रायगड जी.एस. हरळय्या, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता भांडेकर, कार्यकारी अभियंता राठोड, वसाहतीच्या व्हाईस चेअरमन सुवर्णा पुराणिक यांच्यासह पनवेल सहकारी औद्योगिक वसाहतीमधील सर्व उद्योजक सभासद त्यांच्या कुटुंबीयांसह कामगार या कार्यक्रमाला उपस्थित होते.

पनवेलची ही सर्वाधिक जुनी औद्योगिक वसाहत आहे. येथील सोयी सुविधासाठी, विकासकामांसाठी १५ कोटी मंजूर केले आहेत. या वसाहतीच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येईल असेही पालकमंत्री यांनी या वेळी सांगितले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी या परिसरातील प्रश्न मांडले. पनवेल वसाहतीचे अध्यक्ष विजय लोखंडे यांनी प्रास्तविक केले.

# रोहित पवारांवर ईडीची कारवाई

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची बारामती ॲग्रो लिमिटेडच्या संबंधित संपत्ती जप्त करण्यात आली आहे. मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीने ही कारवाई केली असून रोहित पवार आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला हा मोठा धक्का असल्याचे मानले जातेय.

**'बारामती ॲग्रो'च्या कारखान्यावर जप्ती**



ईडीने रोहित पवारांशी संबंधित बारामती ॲग्रो संबंधित औरंगाबादमधील कन्नड साखर कारखान्यातील १६१.३० एकरची संपत्ती जप्त केली आहे. त्यामध्ये जमीन, शुगर प्लाट, साखर कारखान्याची इमारत आणि इतर गोष्टींचा समावेश आहे.

कन्नड सहकारी साखर कारखाना आजारी झाल्यावर त्याचा राज्य सहकारी बँकेने लिलाव केला. हा कारखाना ५० कोटी रुपयांमध्ये रोहित पवारांच्या बारामती ॲग्रो लिमिटेडने खरेदी केला होता. या प्रक्रियेमध्ये घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आला होता. याच प्रकरणी ईडीने बारामती ॲग्रोची चौकशी केली. या लिलाव प्रक्रियेतील कंपन्यांचे एकमेकातले व्यवहार हे संशयास्पद असल्याचा आरोप ईडीकडून करण्यात आला आहे.

# आमदार महेश बालदी यांच्या मागणी व पाठपुराव्यातून आज विकासकामांचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या मागणी व पाठपुराव्यातून विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच विविध योजनांच्या लाभार्थ्यांना वाटप सोहळा शनिवारी (दि. ९) सायंकाळी ४ वाजता आपटा सारसई बागेचीवाडी येथे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या हस्ते होणार आहे.

माडभुवन आदिवासी वाडीचे भूखंड वाटप, सभागृहाचे भूमिपूजन, आदिम घरकुल योजनेंतर्गत गृहप्रवेश, आदिवासी विकास प्रकल्प योजनेंतर्गत मच्छिमार बोटींचे व जाळ्यांचे वाटप, जलजीवन मिशन नळपाणी पुरवठा योजना भूमिपूजन, तसेच बाळुमामा मंदिर कोनशिला पूजन आदी कार्यक्रम या वेळी करण्यात येणार आहेत.

## निवडक

### बुलढाण्यात भीषण अपघातामध्ये तिघे ठार

**बुलढाणा :** जिल्ह्यात भरधाव आयशर-ट्रकच्या भीषण अपघातात तीन जण ठार झाले तर एक जण गंभीर जखमी झाला. यामध्ये दोन्ही वाहनांचा दर्शनीय भागाचा पूर्ण चुराडा झाला. राष्ट्रीय महामार्ग ५३वर तालसवाडा फाट्यानजीक शुक्रवारी (दि. ८) सकाळी ही घटना घडली. ही घटना घडल्यानंतर राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची एकच गर्दी झाली होती.

### राजस्थानमध्ये विजेच्या धक्क्याने १७ मुले भाजली

**कोटा :** राजस्थानच्या कोटा शहरात महाशिवरात्रीनिमित्त भगवान शंकराची मिरवणूक निघाली होती, मात्र या मिरवणुकीदरम्यान एक दुर्घटना घडली. ज्यात विजेचा धक्का लागून १७ मुले भाजली गेली आहेत. मिरवणुकीत २० ते २२ फुटांच्या लोखंडी पाईपला लावलेला एक झेंडा रस्त्यावरील हायटेन्शन तारेला लागला. ज्यामुळे एक मुलगा गंभीररित्या भाजला गेला. त्याला वाचविण्यासाठी इतर मुले पुढे सरसावली, मात्र त्यांनाही विजेचा जोरदार धक्का बसला.

# हर हर महादेव...!

## रायगडात महाशिवरात्र उत्साहात




**अलिबाग : प्रतिनिधी**

महाशिवरात्रीनिमित्त रायगड जिल्ह्यातील सर्वच शिवालयांमध्ये बम बम भोले, हर हर महादेवचा गजर घुमला. मोठ्या उत्साहात धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून महाशिवरात्र साजरी झाली.

दक्षिण काशी अशी ओळख असलेल्या श्री क्षेत्र हरिहरेश्वर, अलिबाग शहरातील श्री काशीविश्वेश्वर मंदिर, आंग्रेकालीन शिवमंदिर, उंच डोंगरावर असलेले श्रीक्षेत्र कनकेश्वर, रांजणखार येथील भुवनेश्वर, अलिबागनजिक गोकुळेश्वर, सिध्देश्वर, रामधरणेश्वर, चौलमधील रामेश्वर, सोमेश्वर, गोरेगांव येथील श्री मल्लिकार्जून मंदिर, पेणचे श्री पाटणेश्वर, घारापुरी येथेही महाशिवरात्र उत्सव उत्साही वातावरणात साजरी झाली.

शहरातील काशीविश्वेश्वर मंदिरात सकाळपासून भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या तर कमळ नागरी पतसंस्थेच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गेली कित्येक वर्षे ही पतसंस्था भजन मंडळांना एक व्यासपीठ निर्माण करून देत आहे.





**ॐ नम: शिवाय!**

**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी महाशिवरात्रीनिमित्त तालुक्यातील विविध शंकर मंदिरांमध्ये दर्शन घेतले. या वेळी आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर व आदित्य ठाकूर उपस्थित होते.**

# सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर नियुक्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

प्रसिद्ध लेखिका, इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आणि इन्फोसिसचे सह-संस्थापक नारायण मूर्ती यांच्या पत्नी सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून सुधा मूर्ती यांचे अभिनंदन केले आहे. तसेच या नियुक्तीबाबत आनंद व्यक्त केला.



सुधा मूर्ती यांना देशासाठी काम करण्यासाठी एक नवीन जबाबदारी मिळाली आहे. मूर्ती यांनी या निवडीबाबत राष्ट्रपती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, राष्ट्रपतींनी सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड केल्याचा मला खूप आनंद झाला आहे. सामाजिक कार्य आणि शिक्षण क्षेत्रात सुधा मूर्ती यांनी अतुलनीय आणि प्रेरणादायी योगदान दिले आहे. राज्यसभेतील त्यांची उपस्थिती हा आपल्या नारी शक्तीचा एक सशक्त पुरावा आहे. आपल्या देशाचे भवितव्य घडवण्यात महिलांचा मोठा वाटा आहे. सुधा मुर्ती यांची राज्यसभेतील उपस्थिती महिलांची ताकद आणि क्षमता दर्शवते. यशस्वी संसदीय कार्यकाळासाठी मी सुधा मूर्ती यांना शुभेच्छा देतो.



# फिरती वाहने करणार शहरांतील वायू गुणवत्ता सर्वेक्षण

## वास्तवदर्शक नोंद होणार



**मुंबई : प्रतिनिधी**
शहरातील विविध वाहतूक बेट आणि क्षेपणभूमी/भरावभूमीच्या ठिकाणी वायू गुणवत्ता सर्वेक्षण करण्यासाठी फिरत्या वाहनांवरील चार स्वयंचलित वातावरणीय वायू गुणवत्ता सर्वेक्षण केंद्र तयार करण्यात येणार आहेत. मुंबईतील वायू गुणवत्ता निर्देशांकाची वास्तव स्थितीदर्शक नोंद या फिरत्या वाहनांच्या मदतीने करण्यात येणार आहे.

या वाहनांमार्फत उपलब्ध होणारी माहिती प्रयोगशाळेच्या माध्यमातून संनियंत्रित करण्यात येईल. नव्याने वापरात येणारी फिरती वाहने (मोबाईल व्हॅन) नागरिकांच्या प्रदूषणविषयक तक्रारीच्या अनुषंगाने वायू गुणवत्ता सर्वेक्षण करण्यासाठी वापरण्यात येणार आहेत.

मुंबईतील हवेचे प्रदूषण गेल्या एक-दोन वर्षांपासून वाढले आहे. त्यामुळे वाहनांवरील स्वयंचलित गुणवत्ता सर्वेक्षण केंद्रांची संख्या वाढवण्यात येणार आहे. यापूर्वी मुंबईत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि हवामान खात्याने अशी फिरती हवा गुणवत्ता केंद्रे तयार केली आहेत. त्यात आता पालिकेच्या चार फिरती हवा गुणवत्ता केंद्रांची भर पडणार आहे. या फिरत्या स्वयंचलित गुणवत्ता सर्वेक्षण केंद्रामुळे नागरिकांच्या तक्रारींचे जलदगतीने निवारण करणे सोपे होणार आहे, तसेच यंत्रणेलाही मिळालेल्या माहितीचा उपयोग होईल. परिणामी प्रदूषण नियंत्रणासाठी ठोस पावले उचलण्याकरीता ही उपलब्ध आकडेवारी अतिशय उपयुक्त ठरेल, अशी माहिती उपायुक्त (पर्यावरण) मिनेश पिंपळे यांनी दिली.

मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागांतर्गत वायू वैविध्य सर्वेक्षण व संशोधन प्रयोगशाळा कार्यरत आहे. या प्रयोगशाळेमार्फत वातावरणीय वायू प्रदूषण मापन करण्यात येते. अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ कलम ६३ ब अन्वये पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करून दरवर्षी ३१ जुलैपूर्वी महानगरपालिकेस सादर करण्यात येतो. अहवालात मागील तीन वर्षांचे वायू गुणवत्ता सर्वेक्षण अहवाल तसेच इतर विभागाची पर्यावरण संदर्भातील माहिती अंतर्भूत असते.

# मालमत्ता कर वसुलीची मोहीम पनवेल मनपाने केली तीव्र

## थकबाकीदारांवर कारवाईची टांगती तलवार

**पनवेल : प्रतिनिधी**
पनवेल महानगरपालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता कर वसुलीची मोहीम अधिक तीव्र केली असून, वसुली पथकांच्या संख्येत वाढ करण्यात आली आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या सुचनेनुसार जप्ती नोटिसांचे वाटप केलेल्या थकबाकीदारांच्या गृहभेटीवर भर देण्यात येत आहे, तसेच औद्योगिक व व्यवसायिका थकबाकीदारांकडून मालमत्ता कर वसुलीसाठी धडक मोहीम सुरू केली आहे, तसेच थकबाकीदारांवर अटकावणीच्या कारवाईसही सुरुवात करण्यात आली आहे.

आजअखेर चारही प्रभागांमध्ये नऊ पथकांच्या माध्यमातून पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर वसूली मोहीम तीव्र करण्यात आली आहे.



त्यामुळे कर वसुलीमध्येही गेल्या दोन दिवसांमध्ये दोन कोटीची वाढ झाल्याचे दिसून आले आहे. दरम्यान या आर्थिक वर्षात २७३ कोटी मालमत्ता कर जमा झाला आहे, तसेच आत्तापर्यंत एकूण ५६० कोटी मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

नुकत्याच झालेल्या सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिलेली नाही, त्यामुळे मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी पीएमसी टॅक्स ॲप विकसित केले आहे, तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवर जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. याच वेबसाईटवर मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिकेत न येता ऑनलाईन पद्धतीने भरता यावा यासाठी महापालिकेने सिटीझन प्रॉपर्टी टॅक्स पेमेंट गाईड तयार केले आहे. याचा लाभ मालमत्ता धारकांनी घ्यावा.

मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# बम..बम..भोले जयघोषाने उरण शहर दुमदुमले



**उरण : वार्ताहर**
उरण शहरासह ग्रामीण भागात महाशिवरात्रीनिमित्त बम..बम.भोले, हर हर महादेव, ओम नमः शिवायचा गजर ऐकू येत होता. महादेवाच्या मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

घारापुरी येथे दगडाचे मोठी शिवलिंग आहे. त्रिमूर्ती दगडामध्ये कोरीव मूर्ती आहे. तेथे जाण्यासाठी भाविकांनी मोरा बंदरावर खूपच गर्दी केली होती. मोरा बंदर ते घारापुरी येथे जाण्यासाठी एकेरी बोटीचे भाडे ६५ रुपये भक्तांना मोजावे लागत होते. मोरा फड नंबर ५ येथे असलेल्या शंकराच्या मंदिरात कोळी यांनी सर्व भक्तासाठी उपवाससाठी फराळाचे आयोजन केले होते भजन ठेवण्यात आले होते. बोरी येथील होणेश्वर मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

श्री होणेश्वरदेव गोविंदा पथक, मंडळ, बोरी ग्रामस्थ मंडळ व सामाजिक कार्यकर्ते तेजाबशेठ मस्के यांच्या वतीने महाशिवरात्री उत्सवानिमित्ताने श्री होणेश्वरदेव मंदिर येथे महावृंदाभिषेक, महाआरती व भक्तांसाठी फराळाचे आयोजन केले होते. देऊळवाडी येथील संगमेश्वर मंदिरात गोवारी कुटुंबीय कोटनाका यांच्या वतीने सालाबाद प्रमाणे गेली ६० वर्षांपासून अविरत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता.

विनायक येथील ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळा वतीने बी. के. विश्वासभाई यांनी महाशिवरात्रीनिमित्त परमेश्वराची ओळख पुस्तिका व नोट बुक आलेल्या भक्तांना भेट वस्तू दिली. उरण रेल्वेस्टेशन येथील निलकंठेश्वर मंदिरात भक्तांनी रांगेत दर्शन घेतले.

सोनारी गावाजवळील सामाजिक कार्यकर्ते शंकरशेठ कडू यांनी आलेल्या भक्तांना श्री व पुरुषांना वस्त्रवाटप करून महाप्रसादाचे आयोजन केले होते.

# तुर्भे विभागात प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**
महापालिका क्षेत्र एकल प्लास्टिकमुक्त असावे यादृष्टीने तुर्भे विभाग कार्यलयामार्फत विभाग अधिकारी भरत धांडे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण यांच्या सूचनेनुसार विभागात ठिकठिकाणी प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर करणाऱ्या व सार्वजनिक ठिकाणी केरकचरा टाकून उपद्रव करणाऱ्या व्यावसायिकांवर, नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

या कारवाईत स्वच्छता निरीक्षक जयश्री आढळ, संतोष देवरस, विष्णू रावते, हनुमान मेश्राम, योगेश पाटील, विजय दुर्लेकर यांच्या पथकाने दंडात्मक शुल्क रक्कम सहा हजार ७५० रु. वसूल केली व त्यासोबत सहा किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जमा केले.



# विकासकामांच्या जोरावरच महायुतीचा विजय निश्चित -खासदार श्रीरंग बारणे



**पनेवल : रामप्रहर वृत्त**
२०२४ लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळी काही दिवसांतच सुरू होईल. गेल्या आठवड्यात ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पनवेल येथे सभा घेऊन पनवेलला ग्रामीण रुग्णालय नसल्याचे म्हटले होते. याच विषयावर प्रकाश टाकण्यासाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी गुरुवारी (दि.७) उद्धव ठाकरेंना चुकीची माहिती दिली जात असल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले. त्याचप्रमाणे महायुतीने केलेल्या विकासकामांच्या जोरावरच आमचा विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सुरुवातीचे पनवेल ग्रामीण रुग्णालय हे आत्ता महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय म्हणून कार्यरत आहे एवढीही माहितीही कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना नसावी याची खंत खासदार बारणेंनी व्यक्त केली, तसेच पनवेल मतदारसंघाचे भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या उपजिल्हा रुग्णालयासाठी शासन स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा केला असल्याचेही त्यांनी या वेळी नमूद केले. शहरातील गार्डन हॉटलमध्ये शिवसेनेच्या वतीने गुरुवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण, उपमहानगर प्रमुख महेश सावंत, महानगर संघटक मंगेश रानवडे, तालुका प्रमुख रुपेश ठोंबरे, खारघर शहर प्रमुख प्रसाद परब, पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनावणे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

पान १ वरुन

## महिलांचा सर्वंकष विकास साधणारे धोरण जाहीर

सर्व महिला हॉटेल्ससाठी स्थानिक करात १० टक्के सूट, व्यावसायिक करातून १० टक्के सूट आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात १० टक्के आरक्षण, महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांसाठी भूखंड तसेच आरक्षित प्रवर्गातील महिलांसाठी यात प्राधान्य अशा प्रकारच्या सवलती महिला उद्योजकांना या धोरणानुसार मिळणार आहेत.

क्रीडा, कला, व्यावसायिक आणि विज्ञान शिक्षणात महिला आणि मुलींसाठी ३० टक्के आरक्षणही देण्यात आले आहे. शाळेत जाणाऱ्या आदिवासी मुलींमधील गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी, या मुलींना शिक्षणात प्रवेश मिळण्यासाठी आर्थिक मदतीची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील दुर्लक्षित, दुर्गम आणि पोहचण्यास कठीण अशा आदिवासी भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिरे घेणे. कर्करोग, मूत्रमार्ग संक्रमण, क्षयरोग, रजो निवृतीच्या समस्या इत्यादीसाठी निदान, उपचार सुविधा उपलब्ध करून देणे, महिलांची संख्या जास्त असलेल्या आस्थापनांच्या ठिकाणी पाळणाघर सुरु करणे. आदिवासी मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे, सर्व पोलीस मुख्यालयांमध्ये भरोसा कक्ष स्थापन करणे, महापालिका, नगरपालिका प्रभागांमध्ये महिला बचत गटांसाठी स्टॉल जागा उपलब्ध करून देण्याचा विचार करणं यांचा समावेश आहे. यासह ऊस तोडणी सारख्या हंगामी काम करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे स्थापनेचा विचार करणे, शाश्वत नैसर्गिक संसाधन, व्यवस्थापन, हवामान बदल अनुकूलन या संदर्भातील लवचिक धोरणं तयार करणं, मुली आणि महिला खेळाडूंसाठी पायाभूत सुविधा, प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य आणि अनुषंगिक पाठबळ देण्यासाठी विशेष क्रीडा धोरण जाहीर करण्यात येणार असल्याचेही मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं.

त्रिसूत्री अंमलबजावणी समिती : राज्याचे महिला धोरण जाहीर झाल्यानंतर त्याची योग्यरित्या अंमलबजावणी करण्यासाठी आता त्रिसूत्री अध्यक्ष समिती स्थापन करण्यात आली आहे. पहिली समिती मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली असणार आहे. दुसरी समिती महिला आणि बालविकास मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली असणार आहे. तर जिल्हा निहाय अंमलबजावणी करण्यासाठी तिसरी समिती त्या-त्या जिल्ह्यातील पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काम करणार असल्याची माहिती तटकरे यांनी या वेळी दिली. हे चौथे महिला धोरण महिला स्नेही असून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी यात विचार करण्यात आलेला आहे. महिला सक्षमीकरण आणि महिला सशक्तिकरण्यासाठीसुद्धा या धोरणामध्ये विशेष प्रावधान करण्यात आले असल्याचे तटकरे यांनी या वेळी सांगितले.

# कर्जतकरांनी घेतले कपालेश्वराचे मनोभावे दर्शन

**कर्जत : प्रतिनिधी**
महाशिवरात्री असल्याने तालुक्यातील महादेवाच्या मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. सायंकाळी कपालेश्वराची पालखी मिरवणूक काढण्यात आली. कर्जतकरांनी पालखीतील कपालेश्वराचे मनोभावे दर्शन घेतले.

शहरातील श्री कपालेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांनी गर्दी केली होती. महाशिवरात्रीनिमित्त मंदिरात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्री कपालेश्वराची महापुजा करण्यात आली. लघुरुद्ध अभिषेक त्यानंतर सामुहिक शिवलिलामृत पारायण झाले. श्री कपालेश्वरांच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.


सायंकाळी श्री कपालेश्वराची पालखी मिरवणूक ढोल-ताशा पथकाच्या गजरात काढण्यात आली. दीपकबुवा करोडे आणि सहकाऱ्यांचे भजन झाले. आरतीने मिरवणुकीची सांगता करण्यात आली. मुद्रेश्वर मंदिरातही दर्शनासाठी भक्तांनी गर्दी केली होती. तेथे अमित बैलमारे यांच्या हस्ते सपत्नीक अभिषेक करण्यात आला. रात्री महाप्रसाद देण्यात आला.

कर्जत तालुक्यातील पांडवकालीन वैजनाथ येथील मंदिरात शिवभक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. वैजनाथ येथील मंदिरात शिवभक्तांसाठी यात्रा तेथे भरली होती. कोल्हारे येथे त्रिवेणी संगमावर असलेल्या पांडवकालीन शिवमंदिरामध्ये शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी सकाळी प्रचंड गर्दी झाली होती.



# महानिर्मितीचा ऊर्जा प्रकल्प विकासकांशी संवाद


**मुंबई : प्रतिनिधी**
महानिर्मितीच्या वतीने देशपातळीवरील अनुभवी नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प विकासकांशी संवादात्मक बैठक हॉटेल ताज, मुंबई येथे झाली. या वेळी डॉ. पी. अन्बलगन यांनी विकासकांनी या संधीचे सोने करावे, आपली व्यावसायिक पत वाढवून या राष्ट्रीय कार्यात पुढे यावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अन्बलगन यांनी भूषविले तर मंचावर संचालक (प्रकल्प) अभय हरणे, संचालक (वित्त) बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) संजय मारुडकर, संचालक (खनिकर्म) डॉ. धनंजय सावळकर, कार्यकारी संचालक पंकज नागदेवते, राजेश पाटील डॉ. नितीन वाघ, नितीन चांदुरकर तसेच मुख्य अभियंते राजेशकुमार ओसवाल, संजय कुऱ्हाडे, किशोर राऊत प्रामुख्याने उपस्थित होते. या वेळी त्यांनी प्रकल्प तपशील, निविदा पात्रता निकष, प्रकल्प कालावधी, आवश्यक परवानग्या, स्थानिक अडचणी, आर्थिक निकष, विकासक नोंदणी, तांत्रिक अटी व शर्ती, गुणवत्ता



चाचणी, अनुभव, देखभाल-दुरूस्ती, संचलन-सुव्यवस्था आदी विषयांवर आपली भूमिका मांडली व सकारात्मक चर्चा झाली, तसेच महानिर्मितीच्या या पुढाकाराबाबत विकासकांनी महानिर्मितीच्या भूमिकेचे स्वागत केले. प्रारंभी महानिर्मितीची सर्वसमावेशक अशी चित्रफित उपस्थितांना दाखविण्यात आली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उपमुख्य अभियंता (सौर) अजय बगाडे यांनी, तर आभार प्रदर्शन मुख्य अभियंता (सौर) संजय कुऱ्हाडे यांनी केले. बैठकीला महानिर्मितीचे वरिष्ठ अधिकारी व देशभरांतर्गत नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प विकासक उपस्थित होते.

## दुखवटा

### विठोबा बालाजी पवार



**माणगाव** : म्हसळा तालुक्यातील पंचायत समिती शाखा क्र.४ (३६ गाव) शाखेचे सरचिटणीस ज्येष्ठ बौद्ध उपासक तोंडसुरे गावचे अध्यक्ष विठोबा बाळाजी पवार यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांच्या मुलगा, जावई, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मृत्यूसमयी ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाची बातमी कळताच विविध संघटनांचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### धनाजी म्हात्रे



**नवी मुंबई** : नेरूळ गावातील आदर्श शिक्षक धनाजी म्हात्रे गुरुजी यांचे नुकतेच वयाच्या ८२ वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. म्हात्रे गुरुजी यांनी ३४ वर्षे ज्ञानदानाचे काम केले. शिक्षण हे आनंददायी, उपक्रमशील असावे यासाठी गुरुजींनी आपल्या अध्ययन, अध्यापन पद्धतीत नवनवीन प्रयोग केले. धनाजी म्हात्रे गुरुजी यांच्या जाण्याने फार मोठी पोकळी निर्माण झाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# पनवेलच्या ग्रामीण भागात विकासकामांचा धडाका

## शेडुंग ते भिंगार भेरलेवाडीपर्यंत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत शेडुंग गाव ते भिंगार भेरले वाडीपर्यंतच्या रस्त्याचे काम भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मार्गी लागले आहे. या कामांचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि तालुका सरचिटणीस भुपेंद्र पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.८) झाले.

दरम्यान मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ८९ लाख २५ हजार रुपयांच्या निधीमधून १.१५० किमी रस्त्याचे डांबरीकरण आणि ४०० मीटरच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या वेळी भाजपचे पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भुपेंद्र पाटील, सरपंच गुलाब रामदास वाघमारे, उपरपंच अशोक गायकर, ग्रामपंचायत सदस्य सुभाष पाटील, सुनील नारायण पाटील, रीना राजेश पाटील, शर्मीला मंगेश लहाणे, आषा वाघमारे, सुप्रीया गायकर, उज्ज्वला वाघमारे, करीना संदेश पाटील, भाजपचे पळस्पे पंचायत समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, उपाध्यक्ष संदेश पाटील, माजी सरपंच योगेश लहाणे, रामदास खेत्री, निलेश पवार, निलेश पवार, सतीष पाटील, माजी सरपंच निवृत्ती शेंद्रे, रमेश पाटील, सुरेश नाईक, काशीनाथ वाघमारे, रमेश वाघमारे, मनु वाघमारे, रामदास म्हात्रे, बबन पाटील, सुनील टावरे, मंगेश लहाने, शिवाजी पाटील, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



**पनवेल : रायगड जिल्हा उद्योग परिषदेत उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते व भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा २०२३-२०२४ पुरस्कारप्राप्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा गौरव करण्यात आला. या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, मुख्यध्यापिका राज अलोनी, इतर शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.**





**पनवेल : राजिपचे माजी सदस्य अमित जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, भाजप ओबीसी सेलचे दशरथ म्हात्रे, पनवेल पं. स. माजी सदस्य भुपेंद्र पाटील, राजेश पाटील, आप्पा गायकवाड, राजेश पाटील, उमेश पाटील, प्रशांत गांगर्डे आदी उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे, विकास म्हात्रे)







**पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कुंडेवहाळ, भिंगार, चिंध्रण, तळोजा मजकूर, खुटारी येथे शिवमंदिरांमध्ये उत्सवाला भेट देत महादेवाचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, सुभाष जेठू पाटील, शिवाजी दुर्गे, नंदकुमार म्हात्रे, कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे सरपंच सदाशीव वास्कर, महेश पाटील आदी उपस्थित होते.**(छाया : प्रफुल्ल कांबळे)

# विशेष मुलांच्या शाळेत महिला दिन साजरा

**पनवेल : वार्ताहर**

डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत अभिनव पद्धतीने शुक्रवारी (दि.८) महिला दिन साजरा केला गेला. पनवेल परिसरातील स्वतःचा व्यवसाय व कार्यक्षेत्रात आघाडीचे भूमिका निभवणाऱ्या, समाजातील उपेक्षित घटक म्हणून दुर्लक्षित गेलेल्या विशेष शाळेला मदत करणाऱ्या समाजसेविका, सेवाभावी संस्था, क्लबच्या अध्यक्षा, सामान्य शाळेतील मुख्याध्यापिका अशा पाच प्रतिभासंपन्न महिलांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यामध्ये अलका कोळी (स्किल डेव्हलपमेंट ऑफिसर रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर), सई पालवणकर (रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन), मधु प्रजापती (समाजसेविका), मीना सजवान (मुख्यध्यपिका सेंट मेरी स्कूल, सुकापुर), वंदना भारदवाज (मुख्यध्यापिका सेंट जॉर्ज हायस्कूल, आदई) या महिलांचा त्यांच्या कार्यस्थळी जाऊन सत्कार करण्यात आला.

हिमानी भोईर, महानंदा निकम, स्वाती माने, जयश्री वर्पे या यांनी डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचलित बौद्धिक अक्षम मुलांचा विषय शाळेतर्फे त्यांचा सत्कार केला.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांना द्रुकश्राव्य माध्यमातून जागतिक महिला दिनाबद्दल माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेली फुले व ग्रिटिंग शाळेच्या मुख्याध्यापिका, महिला शिक्षिका व कर्माचारी यांना देऊन त्यांचा गौरव केला.





## संपादकीय

# बेदरकारीला चाप हवाच

वाघ हा जंगलामधील अन्नसाखळीच्या केंद्रस्थानी असतो. वाघ टिकला तर जंगलातील अवघ्या वन्यजीवविविधतेचा समतोल टिकून राहतो हे आता जगभरात एक प्रस्थापित पर्यावरणीय तत्त्व मानले जाते. त्यामुळे जिथे जिथे वाघ आहे, अशा सर्व अभयारण्यांमध्ये वाघांना जपण्याच्या दृष्टीने सर्व खबरदारी घेतली जाते. भारतातील सर्वात पहिले राष्ट्रीय उद्यान तसेच सर्वांत पहिला व्याघ्रप्रकल्प असलेले जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान मात्र सध्या अशा जपणुकीऐवजी जंगलाच्या अतिशय बेदरकार अशा कत्तलीसाठी चर्चेत आले आहे.

**उत्तराखंड राज्यात हिमायलाच्या कुशीत वसलेल्या जिम कॉर्बेट राष्ट्रीय अभयारण्याच्या स्थापनेमागील मुख्य उद्देशच रॉयल बेंगाल टायगर अर्थात बंगाली वाघ या नामशेष होणाऱ्या प्रजातीचे संरक्षण व संवर्धन हा होता. अशा या अभयारण्यातील सहा हजारांहून अधिक झाडे टायगर सफारीच्या नावाखाली तोडण्यात आल्याचे ध्यानात आल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने उत्तराखंडच्या तत्कालीन वनमंत्र्यांना चांगलेच धारेवर धरले आहे. तत्कालीन वनमंत्री हरकसिंग रावत यांची २०२२ मध्ये भारतीय जनता पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती. सध्या ते काँग्रेस पक्षात आहेत. प्रत्यक्षात निव्वळ १६३ झाडे तोडण्याची परवानगी असताना या सफारीच्या आत तब्बल ६०५३ झाडे बेकायदेशीरपणे तोडण्यात आली. वास्तविक जिम कॉर्बेट अभयारण्य हे वाघाइतकेच तिथल्या जैवविविधतेसाठी प्रसिद्ध असताना झाडांच्या या बेसुमार कत्तलीने तेथील वैविध्यपूर्ण परिसंस्थेचे किती मोठे नुकसान झाले असेल याची कल्पनाही करता येणार नाही. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने अतिशय संतप्त अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. इतक्या नामांकित अभयारण्यात हे असे कसे घडले असावे? सुयोग्य दृष्टिकोनाचा संपूर्ण अभाव हे त्यामागील कारण म्हणावे लागेल. कुठलीही अभयारण्ये ही मुळात मानवाच्या रंजनासाठी उभारलेलीच नसतात. वन्यजीवांचे संरक्षण, त्यासाठी त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात अभय मिळवून देणे हा अभयारण्यांचा सुस्पष्ट हेतू असतो, परंतु एखाद्या राज्यात जेव्हा पर्यटन हाच मुख्य व्यवसाय असतो, तिथे अभयारण्याकडेही पर्यटनाच्या दृष्टीने पाहण्याची गल्लत घडते. जंगलात फेरफटका मारून नैसर्गिक अधिवासात मोकळे जीवन जगणाऱ्या वन्यजीवांचे जवळून दर्शन घेण्याचा थरार अनुभवणे पर्यटकांमधील काहींना भुरळ घालते. अशा पर्यटकांसाठी सहसा जंगलाचा एखादा कोपरा राखीव ठेवला जातो, जो प्राण्यांचा अधिवास असलेल्या मूळ जंगलापासून काहिसा दूर असतो, पण अशा फेरफटक्याने पर्यटकांचे समाधान होत नाही व पर्यायाने पर्यटनाला चालनाही मिळत नाही. त्यामुळे जंगलात अगदी आतच पर्यटकांना फेरफटका मारून आणण्याची सोय पुरवली जायला हवी असा विचार करून ही जंगलतोड केली गेली. झाडे तोडून तिथे पर्यटकांच्या निवासाकरिता बांधकाम केले गेले. आपल्या या कृतींमुळे अभयारण्याच्या मूळ हेतुलाच धक्का पोहोचू शकतो हे अभयारण्याची जबाबदारी सांभाळणाऱ्यांच्या ध्यानात येऊ नये ही धक्कादायक बाब असून झालेल्या नुकसानीचे मूल्यांकन ठरवून या नुकसानीस जबाबदार असणाऱ्यांकडून नुकसान भरपाई वसूल करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. २०१७ ते २०२२ दरम्यान झालेल्या या नुकसानीबद्दल न्यायालयाने रावत व माजी विभागीय वनाधिकारी या दोघांनाही जबाबदार ठरवले आहे. यासंदर्भातील अहवाल तीन महिन्यांत सादर करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. झाडांची ही कत्तल म्हणजे जनतेच्या विश्वासाला कचराकुंडीत फेकण्यासारखे आहे असे संतप्त उद्गार न्यायालयाच्या खंडपीठाने काढले. सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतल्यामुळे यापुढे तरी कुठल्याही जंगलात असे काही घडणार नाही अशी आशा बाळगुया.**

# मुरूड तालुक्यात ३०० हेक्टर शेतजमीन पडीक

खबरबात
संजय करडे



मुरूड तालुक्यात सर्वाधिक मोठ्या भरतीमुळे समुद्राच्या लगत अथवा काही अंतरावर असणाऱ्या शेत जमिनीमध्ये समुद्राचे पाणी शिरल्यामुळे ही जमीन खारट झाल्याने नापीक बनण्याचे प्रमाण मोठे झाले आहे. याचे प्रमुख कारण सद्य परिस्थितीची पहाणी केली असता असे दिसून आले की, फार पूर्वी खारलँड विभागामार्फत बांधण्यात आलेले शेतीचे बांध वर्षानुवर्षे जुने झाल्याने या बंधाऱ्याची झीज झाली आहे. एकदा बंधारा बांधला की, त्या ठिकाणची कधीही पहाणी न करणे, मातीचे बंधारे असल्याने मोठ्या भरतीमुळे काही वर्षांनी झीज होऊन या बंधाऱ्यांची उंची कमी होऊन समुद्राचे पाणी या बंधाऱ्यावरून वाहून जाऊन संपूर्ण शेतीत पसरून सर्व जमीन खारट होण्यास मदत झाली आहे.

एखादा बंधारा तुटला अथवा मोठ्या भरतीमुळे मातीचा बंधारा वाहून गेला तरी याची तक्रार खारलँड विभाकडे केली तरी तेथून मिळणार प्रतिसाद हा फार अल्प असतो.त्यामुळे वर्षानुवर्षे बंधारा फुटीर अवस्थेत असल्याने खरे पाणी जाऊन जाऊन सदरची शेती नापीक होण्यास मदत होत आहे. खारलँड विभागाला असे बंधारे बांधण्यासाठी फारच अल्प निधी उपलब्ध होत असतो त्यामुळे नेमकीच कामे फार धिम्यागतीने होत असतात. राजकीय हस्तक्षेकप होत असल्याने लोकप्रतिनिधी यांच्या कडून दबाव निर्माण होऊन जो तो आपल्या विभागात निधी खर्च करतो त्यामुळे जिथे बंधारा आवश्यक आहे तिथे बंधारा बांधण्याची कामे होत नाही. त्यामुळे भरतीचे पाणी सर्व दूरवर पोहचून जास्तीत जास्त क्षेत्र खारे होण्यास मदत होत आहे.

उधाळामुळे शेतात पाणी घुसून नापीक झालेली जमीन पुन्हा लागवडी योग्य होण्यासाठी अत्यल्प भूधारकांना शासन स्तरावर आर्थिक सहाय्य मिळण्याची मागणी होत आहे. याबाबत ज्या शेतकऱ्यांची समुद्राचया पाण्यामुळे शेती नापीक झाली आहे त्यांनी आमच्या प्रतिनिधीजवळ बोलताना सांगितले की, एकतर आम्ही अल्पभूधारक असून शेतात खारे पाणी थांबण्यासाठी मातीचा मोठा बंधारा बांधण्याची आमची ऐपत नाही. शासनाने खारलँड विभाग आहे, परंतु येथे निधी फार कमी दिला जात असल्याने मातीचे बंधारे बांधण्याची कामे फार धीम्या गतीने होत आहेत. यासाठी शासनाने या विभागाला मोठा निधी देणे आवश्यक असल्याचे मत अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे.

मुरूड तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र २६ हजार ५२५ हेक्टर इतके असुन शहरी ३ किमी व ग्रामीण ४२ किमी आहे. सागरकिनारा लाभलेल्या तालुक्यांत ७५ गावे व ७५ हजार लोकसंख्या आहे. भातशेती व मासेमारी हा पारंपारिक प्रमुख व्यवसाय केला जातो. भातशेती क्षेत्र कागदोपत्री ३९०० हेक्टर असले तरी उधाणाने पाणी शेतात घुसल्याने सुमारे ८०० हेक्टर जमीन खारफुटी तसेच खाजणाने व्यापली आहे. म्हणजेच प्रत्यक्षात भात शेती क्षेत्र हे ३१०० हेक्टर भातशेती लागवडीसाठी योग्य असले तरी पडीक क्षेत्र जवळपास ३०० हेक्टर इतके भरेल. केवळ उत्पादन खर्च न परवडल्याने अत्यल्प भूधारकांनी शेती ओस ठेवल्याचे चित्र आहे. म्हणूनच अशा छोट्या शेतकऱ्यांना सरकारी पातळीवर प्रोत्साहन पर आर्थिक सहाय्य तसेच शेती विषयक सल्ला दिल्यास सदरहू पडीक क्षेत्र भातशेती खाली येऊ शकेल अन्यथा हे प्रमाण दिवसेंदिवस वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शेतीचे समुद्राच्या भ्रतीपासून संरक्षण करण्यासाठी मोठे बंधारे आवश्यक असून या साठी शासनाने लक्ष घालण्याची गरज असून यावर मोठा निधी सुद्धा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी मातीचे बंधारे फुटले आहेत त्यावर त्वरित दुरुस्ती अथवा उपाययोजना होणे आवश्यक आहेत. अन्यथा जास्त वर्ष सदरचा प्रश्न दुर्लक्षित राहिल्याने नापीक शेतीचे क्षेत्र दिसागणिक वाढत आहे हा सर्व शेतकऱ्यांना चिंतेचा विषय ठरला आहे.

खारआंबोली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व मोठी शेती असणारे शेतकरी मनोज कमाने यांनी सांगितले कि, मुरुड तालुक्यात समुद्राच्या पाण्यामुळे नापीक शेती होण्याचे प्रमाण वाढत आहे. एकतर येथील शेतकरी हा अल्पभूधारक आहे. म्हणजेच एखाद्याकडे २० गुंठे शेती आहे, परंतु समुद्राच्या पाण्यामुळे १० गुंठे बाधित क्षेत्र झाल्याने उर्वरित १० गुंठे वर शेती करून संपूर्ण परिवाराचे पालन पोषण करावे लागते यासाठी शासनाने बंधारे बांधून हा प्रश्न मार्गी लावला पाहिजे अशी मागणी या वेळी त्यांनी केली. हा विषय खारलँड विभागाशी संलग्न आहे. तेच हे प्रश्न सोडवू शकतात.

त्यामुळे अल्प भूधारक शेतकऱ्याची खारी झालेल्या जमिनीमुळे भाताचे उपपन्न तर घेतलेच परंतु त्याला उपाशी राहण्याची वेळ आली आहे. तेव्हा अल्पभूधारक असणाऱ्या शेतीला समुद्राच्या पाण्यापासून नुकसान झाले असेल तर शासनाने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी मुरूड तालुक्यातील शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# महाराष्ट्र कवी यशवंत दिनकर पेंढारकर

यशवंत दिनकर पेंढारकर हे कवी यशवंत म्हणून प्रसिद्ध होते. बडोद्यात १९४० साली त्यांना राजकवी किताबाने सन्मानित करण्यात आले होते. आज त्यांचा जन्मदिन आहे.

यशवंत दिनकर पेंढारकर हे नामवंत मराठी कवी होते. त्यांनी काव्यवाचन या प्रकाराला प्रसिद्धी मिळवून दिली. १८९९ साली सातारा जिल्ह्यातील तारळे गावी त्यांचा जन्म ९ मार्च १८९९ रोजी झाला. सुरुवातीला सांगलीतील सिटी हायस्कूलमध्ये त्यांनी शालेय शिक्षण सुरू केले. मात्र, प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे ते तिथे शिक्षण पूर्ण करू शकले नाहीत. त्यानंतर उदरनिर्वाहासाठी ते पुण्याला आले. इथे त्यांनी अनेक ठिकाणी कारकून म्हणून काम केले. मात्र, हे करत असतानाच पेंढारकरांनी भरपूर मराठी साहित्य वाचले. त्यातून त्यांना कवितांविषयी प्रेम निर्माण झाले आणि



ते स्वत:च कविता करू लागले.

पेंढारकरांनी प्रणयरम्य, सामाजिक, राष्ट्रीयत्वविषयक अनेक कविता केल्या. पुढे तीन गद्य पुस्तकेही लिहिली. त्यांच्या साहित्यकृतींमध्ये यशवंती (१९२१), महाराष्ट्र वीणाझंकार (१९२२), जय-मंगला (१९३१), कंटाणीचे घर (१९४५), यशोधन (१९५६), छत्रपती शिवराय (१९६८), रणदुर्गा झाशीवाली (१९७७) यांचा समावेश आहे. त्यांनी लहान मुलांसाठीही काव्य केले.

सयाजीराव गायकवाडांच्या मृत्यूनंतर १९३९ साली त्यांचे नातू प्रतापसिंह गायकवाड बडोदा संस्थानाच्या गादीचे प्रमुख झाले. त्यावेळी पेंढारकरांनी काव्यकिरीट या खंडकाव्याची निर्मिती केली होती. साहित्य व शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना १९६९ साली पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले. कवी यशवंत यांनी २५ नोव्हेंबर १९८५ रोजी जगाचा निरोप घेतला.

**(साभार : इंटरनेट)**




# व्हॉट्सॲपमध्ये फोटोचेही बनणार स्टिकर, एडिटही करा

व्हॉट्सॲप एक असे ॲप आहे जे सतत तुम्हाला काही ना काही नवीन फिचर देत असता. काही दिवसांपूर्वी आलेल्या अपडेटनुसार तुम्ही व्हॉट्सॲपमध्येही तारखेनुसार मेसेज सर्च करू शकता. याशिवाय एका नवीन रिपोर्टनुसार ताज्या अपडेटमध्ये लवकरच स्टिकर एडिटर हे फीचर येणार आहे. मेटा कंपनीच्या या ॲपमधील स्टिकर एडिटर फीचर सध्या अँड्रॉईड बीटा टेस्टर्ससाठी रिलीज करण्यात आले आहे. हे फिचर वापरण्यासाठी, तुम्हाला व्हॉट्सॲपचे नवीन अपडेट (तशीीळेप २.२४.६.५) इन्स्टॉल करावे लागेल.



व्हॉट्सॲप एक नवीन टूल आणत आहे, ज्याच्या मदतीने तुम्ही कोणताही फोटो स्टिकरमध्ये बदलू शकता. हे करणे अगदी सोपे आहे. तुम्हाला फक्त स्टिकर कीबोर्डवर जावे लागेल आणि तेथे लीशरींश पर्याय निवडावा लागेल. किंवा तुम्ही तो फोटो थेट उघडू शकता, वर असलेल्या तीन डॉट्सवरील मेनूवर जा आणि तेथून क्रिएट स्टिकर सिलेक्ट करा.

तुम्ही आधीपासून अस्तित्वात असलेले स्टिकर्स एटिड करण्यासदेखील सक्षम असाल. कोणतेही स्टिकर निवडल्यावर व्हॉट्सॲप आपोआप ड्रॉईंग एडिटर उघडेल, जे त्या फोटोचा मुख्य भाग फोकसमध्ये आणेल. त्यानंतर एडिट करून तुम्हाला तो स्टिकर बनवून दाखवला जाईल. तुम्हाला स्टिकर आवडत नसल्यास तुम्ही स्क्रीनच्या तळाशी दिलेल्या पर्यायांमधून दुसरा स्टिकर निवडू शकता.

मिळालेल्या रिपोर्ट्सनुसार युजर्सना नवीन फिचरचा फायदा होईल. ते आता त्यांच्या फोटोंमधून स्वतःचे स्टिकर्स तयार करू शकतील. याद्वारे ते त्यांच्या आवडीनुसार स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे व्यक्त करू शकतील असे टीमकडून सांगितले जात आहे तसेच त्यांना इतर कोणतेही ॲप डाउनलोड करण्याची किंवा बाहेरून स्टिकर्स शोधण्याची आवश्यकता नाही.

अशा प्रकारे व्हॉट्सॲपची कंपनी मेटा आपल्या यूजर्ससाठी सदैव तत्पर असते तसेच नवनवीन फिचर्स आणत असते. नुकतेच जेव्हा 'मेटा'चे ॲप व्हॉट्सॲप आणि इन्स्टाग्राम काही वेळासाठी बंद पडले होते, परंतु काही वेळात ही सेवा सुरू करण्यात कंपनीला यश आले. आता कंपनी तांत्रिक समस्येमुळे अशी परिस्थिती उद्भवल्याचे सांगून माफीही मागितली आहे.

# गायक आणि नट भाऊराव कोल्हटकर

निमित्त



लक्ष्मण ऊर्फ भाऊराव बापूजी कोल्हटकर मराठी रंगभूमीवरील एक श्रेष्ठ गायक नट राहिले आहेत. त्यांचा जन्म ९ मार्च १८६३ रोजी बडोदे येथे झाला. बापूबोवा कोल्हटकर हे त्यांचे पिता व भागीरथीबाई ही माता. भाऊरावांचे शिक्षण कारकुनी करण्यापुरते झाले होते. बडोदे येथील पोलीस आयुक्तांच्या कचेरीत ते साधे कारकून असले तरी एक उत्कृष्ट गायक म्हणून त्या काळी बडोद्यात त्यांची फार प्रसिद्धी होती. सुंदर रूप आणि गोड आवाज हे त्यांचे गुणविशेष.


अण्णासाहेब किर्लोस्करांनी ३१ ऑक्टोबर १८८० रोजी संगीत शाकुंतल नाटकाचा प्रयोग करून संगीत मराठी रंगभूमीची स्थापना केली. त्या काळात नाटकातील स्त्रीभूमिका पुरुषच करीत. आपल्या नाटकातील स्त्रीभूमिका करण्यासाठी अण्णासाहेबांनी भाऊरावांची निवड केली आणि २० सप्टेंबर १८८२ रोजी भाऊरावांनी वयाच्या अठराव्या वर्षी किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रवेश केला. त्याकाळी किर्लोस्करांच्या शाकुंतल नाटकात 'शकुंतला' (१८८२), सौभद्र नाटकात 'सुभद्रा' (१८८२) व रामराज्यवियोग नाटकात 'मंथरा' (१८८४) या भाऊरावांच्या स्त्रीभूमिका अतिशय लोकप्रिय झाल्या. 'सुभद्रे'ची भूमिका तर त्यांनी १८८३ ते १८९७ या चौदा वर्षांच्या काळात अखंडपणे केली. महाराष्ट्रातील घराघरांतून त्यांच्या नावाचा उल्लेख आत्मीयतेने 'भावड्या' असा होऊ लागला.

गोविंद बल्लाळ यांच्या विक्रमोर्वशीय नाटकात 'उर्वशी'ची भूमिका (१८८९) केल्यानंतर भाऊरावांनी नायकाच्या भूमिका करण्यास सुरुवात केली. देवल यांच्या शापसंभ्रम नाटकातील 'पुंडरीक' (१८९३) व मृच्छकटिक नाटकातील 'चारुदत्त' (१८९५) श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या पहिल्या वीरतनय नाटकातील 'शूरसेन' (१८९६) आणि देवलांच्या शारदा नाटकातील 'कोदंड' (१८९९) या भाऊरावांच्या लोकप्रिय व गाजलेल्या पुरुषभूमिका होत. गायन आणि अभिनय या दोहोंचाही एकाच वेळी उठाव करण्याची त्यांची ताकद व हातोटी असामान्य होती. त्यांचा आवाज अत्यंत गोड आणि पल्लेदार असून गायनकलेचे त्यांना उत्तम ज्ञान होते. मराठी नाट्यसृष्टीत संगीत नाटके सुरू झाल्यापासून भाऊरावांसारखा चढा, पल्लेदार, गोड आणि सुरेल आवाज मराठी रंगभूमीवर ऐकावयास मिळाला नाही, असे त्यांच्या चाहत्यांचे महणणे आहे.

भाऊरावांनी केलेल्या भूमिकांच्या अभिनयाचे शिक्षण त्यांना गोविंद बल्लाळ देवल यांनी दिले होते. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या मृत्यूनंतर (१८८५) ते किर्लोस्कर नाटक मंडळीचे भागीदार मालक झाले. अण्णासाहेब किर्लोस्करांनी स्थापन केलेल्या संगीत रंगभूमीची परंपरा त्यांनी आपल्या १८-१९ वर्षांच्या कारकीर्दीत चांगल्या प्रकारे समृद्ध केली. त्यामुळे संगीत रंगभूमीच्या विकासाचे आणि उत्कर्षाचे सारे श्रेय भाऊरावांनाच दिले पाहिजे. १७ मार्च १९०० रोजी पुण्याच्या आर्यभूषण नाटकगृहात भाऊरावांनी 'कोदंडा'ची भूमिका केली. हीच त्यांची शेवटची भूमिका व शेवटचे दर्शन. त्यानंतर मे महिन्यापासून जलोदराच्या विकारामुळे त्यांची प्रकृती बिघडली व त्यातच त्यांचे पुणे येथे १३ फेब्रुवारी १९०१ रोजी निधन झाले.

**-व. शां. देसाई**

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : तापमानात वाढ होऊ लागल्याने ऊसाच्या रसाला नागरिकांकडून मागणी आहे. इंजिनवर धावणाऱ्या गाडीत उसाचे चरक बसवून दुहेरी प्रयोग केला जातो. थंडगार, नैसर्गिक रसाला लोक पसंती देतात. त्या गाडीचे सुबोध ठाकूर यांनी टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# अतिप्रमाणात खाण्याची सवय अशी करा संतुलित

दररोजच्या धावपळीच्या आयुष्यात घरच्या जेवणाऐवजी अनेकदा आपण रेस्टॉरंट किंवा हॉटेलमध्ये जेवण करायला जातो आणि मनाप्रमाणे जेवण मागवतो. अशा वेळी आवडते पदार्थ आपण नेहमीपेक्षा जास्त खातो, पण या सवयीमुळे आपले वजन वाढू शकते. त्यामुळे ही सवय कशी कमी करावी यासाठी आपण काही उपाय जाणून घेणार आहोत, पण त्यापूर्वी हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, गरजेपेक्षा जास्त खाल्ल्याने केवळ वजनच वाढत नाही, तर पचनाच्या समस्यासुद्धा निर्माण होतात. याविषयी न्युट्रिशनिस्ट निधी शर्मा यांनी इन्स्टाग्रामवर अतिप्रमाणात खाणे टाळण्यासाठी काही खास टिप्स सांगितल्या आहेत.



**जेवण करणे कधीही टाळू नका**

जेवण करणे कधीही टाळू नका, पण प्रमाण मात्र १५ ते २० टक्क्यांनी कमी करा. तुम्ही एखाद्या कार्यक्रमाला जाण्यापूर्वी थोडे खा. त्यामुळे तुम्हाला खूप भूक लागणार नाही. जर तुम्हाला कार्यक्रमात खूप भूक लागली, तर तेथील आवडीचे पदार्थ पाहून तुम्ही अतिप्रमाणात खाऊ शकता.

**तुमच्या आवडत्या पदार्थांपासून जेवणाची सुरुवात करा**

तुम्हाला गोड आवडत असेल किंवा कोणताही पदार्थ आवडत असेल, तर त्या पदार्थांपासून जेवणाची सुरुवात करा. मुख्य कोर्स त्यानंतर खा.

**कमी कॅलरी असलेले पदार्थ**

जर तुम्ही वजन कमी करायचा प्रयत्न करीत असाल, तर तळलेल्या भाज्या, ग्रिल्ड पदार्थ जसे की पनीर टिक्का, तंदुरी चिकन इत्यादी पदार्थ आणि सूप प्या. गोड पदार्थ खाणे टाळा.

**सावकाश जेवण करा**

प्रत्येक घासाचा आनंद घ्या आणि सावकाश जेवण करा. त्याशिवाय निधी शर्मा सांगतात, लिंबू पाणी यांसारखे उपचार पचनसंस्थेची पीएच पातळी बदलण्यास मदत करतात आणि तात्पुरता आराम देतात, पण जे अन्न पचवायला मदत करीत नाही. उलट ते तुमच्या शरीरात फॅट्स जमा करतात.

मुंबई येथील अपोलो स्पेक्ट्रा हॉस्पिटलचे आहारतज्ज्ञ डॉ. जिनल पटेल सांगतात, कॅलरी कमी करण्यासाठी प्रमाणात जेवण केले पाहिजे. भरपूर प्रमाणात फायबरयुक्त अन्न खाल्ले पाहिजे. आहारात बीन्स, भाज्या, ओट्स व फळांचे सेवन केले पाहिजे. त्यामुळे तुम्हाला जास्त भूक लागत नाही.

याचबरोबर डॉ. पटेल सांगतात, अतिप्रमाणात खाणे टाळण्यासाठी तुम्ही काय खावे याकडे लक्ष द्या. प्रोटीनयुक्त आहार घ्या. आहारात जर प्रोटीन असेल, तर तुम्हाला फार भूक लागणार नाही.

# पोलादपूरच्या पळचिल उंबरकरवाडीमध्ये वणव्याचा हाहाकार

## सहा गुरांसह १५ कोंबड्यांचा वाडा चारा-वैरणीसह जळून खाक

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पळचिल ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील उंबरकरवाडी येथे बुधवारी वणव्याचा हाहाकार उडाला. या वेळी सहा गुरे आणि १५ कोंबड्या असलेल्या गुरांच्या गोठ्याला आग लागून संपूर्ण गोठा चारा-वैरणीसह जळून खाक झाल्याची घटना घडली.





गेल्या काही दिवसांपासून रत्नागिरी जिल्ह्याच्या हद्दीतून वणव्याच्या आगीचे लोळ पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटाच्या दिशेने येत असून बुधवारी दुपारी झालेल्या अग्निकांडामध्ये या २१ निष्पाप जीवांचा मृत्यू ओढावला. पळचिल उंबरकरवाडी येथील गरीब शेतकरी बाबाजी धाऊ बर्गे यांच्या गुरांच्या गोठ्याला वणव्यामुळे आग लागली आणि संपूर्ण वाडा जळून खाक झाला. या वेळी वाड्यात बांधलेल्या सहा गुरांचा होरपळून मृत्यू झाला. या आगीत एक म्हैस, एक रेडा, दोन वासरे, दोन रेडकू अशी एकूण सहा जनावरे आणि १५ कोंबडया भस्मसात झाल्या. वणव्यामुळे भडकलेल्या आगीमध्ये गुरांच्या वाड्याचे पत्रे, कौले, वासे, गुरांचा चारा व वैरण असे संपूर्ण जळून खाक झाले.

बाबाजी धाऊ बर्गे यांचे अंदाजे तीन लाख ४९ हजार रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती पंचनाम्याअंती प्राप्त झाली आहे. वणव्यामुळे लागलेल्या आगीची माहिती मिळताच पोलीस पाटील आनंद निविलकर, माजी उपसरपंच उमेश मोरे व ग्रामस्थ यांनी घटनास्थळी धाव घेऊन वनविभाग तसेच तहसील कार्यालय येथे घटनेची माहिती दिली असून तहसील कार्यालयामार्फत तलाठी रितू सुदर्शने आणि कोतवाल अपूर्वा माने यांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा केला.

वणव्यामुळे झालेल्या नुकसानीनंतर शासनाकडून त्यांना तातडीची मदत करण्यात यावी, अशी पळचिल पंचक्रोशीमध्ये मागणी होत आहे.

---


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that my client M/s ASHTAVINAYAK ENTERPRISES through its Partners 1) Mr. Jatin Deshbhushan Agarwal & 2) Mr. Anil Parumal Garera, Office address C2, Building No. 1, Ground Floor, Unit No. 4, Sector 2, Opp. Abbott Hotel, Vashi Navi Mumbai 400703., has transferred 200 Sq.mtrs. of plot of land bearing no. Plot No. 2A, Sector 18, Taloja Node, from Mr. Jatin Deshbhushan Agarwal, residing at 61, Sarla Manolar, Plot No. 19, Sector 17, Vashi, Navi Mumbai 400703 and Mr. Anil Parumal Garera, residing at Flat No. 702, Vighnahar Heights, Plot No. 5-6, Plam Beach Road, Sector 14, Nerul West, Navi Mumbai,

**SCHEDULE OF PLOT**

| Node Name | Plot No. | Sector No. | Area |
|---|---|---|---|
| Taloja | 2A | 18 | 200 Sq.mtrs. |

Any person/s having any claim against or to the said Plot by way of sale, Mortgage, Charge, Gift, Lease, Easement, Use, Trust, Possession, Inheritance, Lien or otherwise however it is hereby required to make the same known to the undersigned at his office address given herein above within the period of 15 days from the date of publication hereof otherwise the transaction /sale will be completed without reference to such claims and the same if any will be considered as waived.

Date - 08/03/2024

Sd/-
Advocate
Adv. Pankaj Mandhare

UL-2/11, 702, 7th Floor, Sector 19A, Unnati, Ulwe, Panvel 410206
Mob. - 9702416111. adv.pankajmandhare@gmail.com


---

# माझी शाळा सुंदर शाळा अभियानात मेहेंदळे हायस्कूल द्वितीय

**नागोठणे : बातमीदार**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात रोहा तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात कोकण एज्युकेशन सोसायटीचे मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकाविला.



या अभियानात १०७ वर्षात प्रदार्पण करणाऱ्या मेहेंदळे हायस्कूलने शासनाने ठेवलेल्या ३० निकषांपैकी सर्वच निकषे पूर्ण केली. या शाळेची भव्य इमारत, हिरवीगार पारसबाग, परिसर व वर्ग स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सोय, डिजिटल वर्ग खोल्या, क्रीडा खेळांची प्रशस्त मैदाने, प्रयोगशाळा ,संगणक कक्ष, स्काऊट गाईड, आरएसपी इत्यादी बाबींचे परीक्षकांनी कौतुक केले. अभियानामध्ये सहभागी झालेले मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या मेहनतीमुळेच कोएसो मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाला तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळाला.

गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन संदीप गांगल, प्राचार्य रमेश मोसे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे पालकवर्गाकडून कौतुक होत आहे.

---

## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद

### ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**फेब्रुवारी २०२४**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | संजय राजेश गुप्ता | तहसीलदार चुल्ली प्रजापती | पवल १-९५९५-२०२३ | ३/११/२०२३ | घर मिळकत क्र.१४१, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २ | प्रकाश गोविंद मोरे/ वैजयंती प्रकाश मोरे | मे.स्टार इंटरप्रायजेस तर्फे विलास शंकर लोंढे | पवल १-९४६४-२०१८ | २१/०९/२०१८ | सदनिका नं.जी ५, तळमजला, शितल व्हिला, मौजे पालीदेवद |
| ३ | विनोद देवजी जाधव/ कांचन विनोद जाधव | कल्पना नरेश ठाकूर | पवल २-५२४९-२०२३ | ३०/०३/२०२३ | सदनिका क्र.१०५,पहिला मजला,जनलक्ष्मी को.हौ.सो.,मौजे शिलोत्तर रायचूर |
| ४ | गणेश सिंह/भावना गणेश सिंह | शितल नामदेव बागवे/ नामदेव बाबुराव बागवे | पवल ५-१९०७१-२०२३ | १५/१२/२०२३ | सदनिका नं.६०८,सहावा मजला, के विंग, बालाजी सिम्फोनी को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर |
| ५ | हर्षल मोहन मेथा/ सरोज हर्षल मेथा | सदानंद गोपाळ बांदेकर/ सुप्रिया सदानंद बांदेकर | पवल ३-१८२८०-२०२१ | १८/११/२०२१ | सदनिका क्र.३०३, तिसरा मजला,सी विंग, निंबेश्वर आंगण को.हौ.सो.,मौजे पालीदेवद |
| ६ | मदनलाल गुर्जर | मे.रामरत्न बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे विनोदकुमार मनोहरलाल जैन | पवल २-२१८९७-२०२३ | १३/१२/२०२३ | शॉप नं.३, तळ मजला,ए विंग, श्री वसंत विहार को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर |
| ७ | यशवंत हरी मोरे/ ज्योत्स्ना यशवंत मोरे | महेंद्र विष्णू गांगण | पवल २-३३९७-२०२२ | ८/३/२०२२ | सदनिका क्र.२०३, दुसरा मजला, शितल व्हिला मौजे पालीदेवद |
| ८ | माधवी शांताराम कदम/ मनिषा शांताराम कदम | संतोष राजेशकुमार जैन/ केशरी मल जैन | पवल २-२०६८८-२०२३ | २८/११/२०२३ | सदनिका क्र. बी २०२, दुसरा मजला, पुष्पश्री को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ९ | सुमित महेंद्र कडाले/ सुनिता महेंद्र कडाले/ महेंद्र रामचंद्र कडाले | विशाल प्रमोदचंद्र शाह/ मेघना विशाल शाह | पवल १-६७१-२०२४ | २९/०१/२०२४ | सदनिका क्र.२००६,विसावा मजला, जे विंग, बालाजी सिम्फोनी को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १० | प्रविण विलास शिरोळे | विलास राहिनाथ शिरोळे | पवल २-१९७३-२०२४ | ३१/०१/२०२४ | साईसागर को.हौ. सोसायटी |
| ११ | निर्मला पुजारी/रघु पुजारी | मे.जे.एच.व्ही.कन्स्ट्रक्शन तर्फे अभिषेक जैस्वाल | पवल ४-८५९०-२०१७ | २८/०७/२०१७ | सदनिका क्र.२०५,दुसरा मजला, ए विंग,बि.नं. ५,साई इन्क्लेव्ह को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १२ | पुरुषोत्तम नायडू | अरुण जेनेट नाडर | पवल १-८०३-२०२४ | २/२/२०२४ | सदनिका क्र.०१, तळ मजला, बि.नं.डी ३, स्नेह मिलन को.हौ.सो.मौजे पालीदेवद |
| १३ | तानाजी वसंत सावंत/ वैशाली तानाजी सावंत | मे.एन.सी.डेव्हलपर्स तर्फे विनोद तुकाराम चांदे | पवल ३-३८१०-२०२१ | २४/२/२०२१ | सदनिका क्र.१०२, पहिला मजला, ए विंग, सद्गुरु रेसिडेन्सी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १४ | दिलीप ज्ञानेश्वर पेडणेकर | रुही रामचंद्र गुरवे/ रेहमान कमल शेख | पवल १-१०५९६-२०२३ | १२/१२/२०२३ | रो हाऊस नं.५६, विघ्नहर्ता इन्क्लेव्ह को.हौ. सो.फेज ३, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १५ | सुनिलकुमार सोहनलाल राजभर | सचिन रामचंद्र गुरखे/ पुनम सचिन गुरखे | पवल ३-५०३५-२०२३ | २०/०३/२०२३ | सदनिका क्र.२०४,दुसरा मजला, ओम साई रेजन्सी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १६ | रत्ना राजेंद्र वाघ/ राजेंद्र हिम्मतराव वाघ | प्रिती मनिष भल्ला/दिनेश मनसुखलाल ठक्कर | पवल १-९३९-२०२४ | ८/२/२०२४ | सदनिका क्र.१७०८,सतरावा मजला,जे विंग, बालाजी सिम्फोनी को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १७ | साहिल गर्ग/गीता राणे | रेखा नेमाराम चौधरी | पवल ४-१८०५-२०२४ | १/२/२०२४ | शॉप नं.६, तळ मजला, स्वामी सदन को.हौ. सो., मौजे पालीदेवद |
| १८ | हरेश नागेश्वर पाटील/ विजया हरेश पाटील | वेकट विद्यासागर अलीना | पवल २-१५११-२०२४ | २४/०१/२०२४ | सदनिका क्र.००३,तळ मजला, बि.नं.२, /श्रद्धासंकुल को.हौ.सो.मौजे पालीदेवद |
| १९ | लक्ष्मण दगडू घाडगे/ मिनाक्षी लक्ष्मण घाडगे | चंद्रकांत चाहू पोपेटा | पवल २-११९६-२०२४ | १८/०१/२०२४ | शॉप नं.१०४,पहिला मजला, पोपेटा प्रॉपर्टीज, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २० | आशुतोष लक्ष्मण घाडगे/ अनिकेत लक्ष्मण घाडगे | चंद्रकांत चाहू पोपेटा | पवल २-१३०६-२०२४ | १९/०१/२०२४ | शॉप नं.१०१,पहिला मजला, पोपेटा प्रॉपर्टीज, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २१ | लक्ष्मण दगडू घाडगे/ मिनाक्षी लक्ष्मण घाडगे | चंद्रकांत चाहू पोपेटा | पवल २-११९७-२०२४ | १८/०१/२०२४ | शॉप नं.१०५,पहिला मजला, पोपेटा प्रॉपर्टीज, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २२ | शिखा मनोज खंतवाल/ आकाश मनोज खंतवाल | आगा रियालिटी तर्फे प्रो.तौसिफ जे. आगा | पवल २-७८२६-२०२३ | १२/५/२०२३ | सदनिका क्र.४०९, ओम साई रेजेन्सी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २३ | मोहम्मद सद्दाम/ नसरीन मोहम्मद सद्दाम | मे.स्वामी समर्थ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे नीला दिगंबर गडकरी तर्फे निलीमा नाक्ती | पवल २-१९६३२-२०२३ | ७/११/२०२३ | सदनिका क्र.२०५, दुसरा मजला, शुभारंभ, मौजे पालीदेवद |
| २४ | मोहम्मद अस्लम दुलार/ मोहम्मद शेख | अरुण जेनेट नाडर | पवल २-३४२४-२०२४ | १६/०२/२०२४ | सदनिका क्र.डी २१२, तळ मजला, स्नेहमिलन को.हौ.सो.लि., मौजे पालीदेवद |
| २५ | प्रियांका चंद्रकांत हुबळीकर/ स्मुर्ती चंद्रकांत हुबळीकर/ विजया चंद्रकांत हुबळीकर | भुबनभोय तुलसीदास बॅनर्जी /उर्मिला भुबेन बॅनर्जी | पवल १-५०८-२०२४ | १९/०१/२०२४ | सदनिका क्र.२०३,दुसरा मजला, डी विंग, निंबेश्वर पार्वती को.हौ.लि. मौजे पालीदेवद |
| २६ | योगिता बिपिन कासकर | मे.माउली प्रसाद इंटरप्रायजेस तर्फे निकिता महेश पाटील | पवल १-८२२५-२०१८ | १३/०८/२०१८ | सदनिका क्र.२०२, दुसरा मजला,दिव्या निवास, मौजे पालीदेवद |
| २७ | किरण चाहू पोपेटा | चाहू चांगदेव पोपेटा | पवल ४-१८२६-२०२४ | १/२/२०२४ | शॉप नं.०६, तळ मजला,मौजे शिलोत्तर रायचूर |
| २८ | मकरंद मनोहर भोसले/ रुपाली मकरंद भोसले | नलिनी अशो तांबे | पवल ५-३९८-२०२० | ११/०१/२०२० | सदनिका क्र.१२०८,१२ वा मजला, बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २९ | प्रेमाबाई नामदेव म्हात्रे | नामदेव कमळू म्हात्रे | | | घर मिळकत क्र. ८३/१,मौजे शिलोत्तर रायचूर |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

---

## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद

### ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**जानेवारी २०२४**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | जयओमप्रकाश मधुकर भगत | मे.गंगा होम्स तर्फे किशोर काळुराम चौधरी | पवल ४-४५५४-२०२० | २२/०९/२०२० | सदनिका नं.ई २०२,दुसरा मजला,ई विंग, गंगा गणेश को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| २ | हरिवंश जगदीश सिंग | इंद्रबहादूर सिंग | पवल २-९१६४-२०२३ | २९/०५/२०२३ | सदनिका क्र.१२, तिसरा मजला, तांडेल निवास घर क्र. ४०२, मौजे पालीदेवद |
| ३ | सुभाष दत्ताराम भेलेकर | भाउ शनिवार केणी मयत तर्फे वारस निलेखा भाउ केणी | पवल २-६१०८-२०२० | ४/९/२०२० | सदनिका क्र.१०४,पहिला मजला,दत्त आशिर्वाद,मौजे शिलोत्तर रायचूर |
| ४ | चौकेंद्र गणपत नार्वेकर | तृप्ती सुनिल तांडेल | पवल ४-१३१५५-२०२१ | ३/१२/२०२१ | सदनिका क्र.९,दुसरा मजला, तांडेल निवास, मौजे पालीदेवद |
| ५ | रहमतुल्ला दुलारमोहम्मद शेख /सजदाखातून रहमतुल्ला शेख | मंगेश किसन कांबळे/ द्रौपदा किसन कांबळे/ मंगेश किसन कांबळे/ संतोष किसन कांबळे/ धनंजय किसन कांबळे | पवल १-१११०२-२०२३ | २९/१२/२०२३ | सदनिका क्र.५,बि.नं.डी.१,पहिला मजला, स्नेहमिलन को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ६ | सुहास मच्छिंद्र जेजुरकर/ प्रियांका सुहास जेजुरकर | मायरा मुख्तार अली अन्सारी /अन्सारी मुख्तार अली मोहम्मद कासीम | पवल ५-१९५४२-२०२३ | २३/१२/२०२३ | सदनिका क्र.८०७,आठवा मजला, जे विंग, बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| ७ | सुरेखा किरण शिंदे/ किरण कृष्णा शिंदे | मे.राम रत्न बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे विनोद तुकाराम चांदे | पवल ३-२१९७१-२०२२ | २८/१२/२०२२ | सदनिका क्र.४०७,चौथा मजला, ए विंग, श्री वसंत विहार को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ८ | मोहित अशोक अग्रवाल (२ रे मालक) | जालिंदर ए.खांडेकर (सेंट्रल बँक ऑफ इंडिया-सेंट बँक होम फायनान्स लि. **१ ले मालक**) | पवल १-०६९०६-२००९ | २२/१०/२००९ | सदनिका क्र.०९, दुसरा मजला, सहारा कॉम्प्लेक्स सोसायटी, बि.नं.०२, मौजे शिलोत्तर रायचूर |
| | निलम अग्रवाल (३ रे मालक) | मोहित अशोक अग्रवाल | उरण ०१०१३-२०१० | १/२/२०१० | |
| ९ | प्रशांत प्रदीप खांडेकर/ प्रदीप भगवान खांडेकर | मे.राम रत्न बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे विनोद तुकाराम चांदे | पवल ३-१८३५५-२०२२ | १/११/२०२२ | सदनिका क्र.४०९, चौथा मजला, सी विंग, श्री वसंत विहार को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १० | प्रमिला संतोष साठे | गणेश भागोजी गोरेगावकर | पवल २-२१२१२-२०२३ | ५/१२/२०२३ | सदनिका क्र.डी १०१, पहिला मजला,बि.नं. एफ, ओम शिवा कॉम्प्लेक्स को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ११ | विनोद मुरलीधर मेश्राम | रुपेश डोंगरनाथ रजपूत व सुलभा रुपेश रजपूत यांच्या तर्फे जयश्री अवधूत म्हात्रे | पवल १-२८-२०२४ | २/१/२०२४ | सदनिका क्र.१८०४,आठरावा मजला,जे विंग, बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १२ | रोहिनी सुरेश गुरव/ राहूल सुरेश गुरव | रेखा अंबाजी पिंगळे | पवल ३-४८५२-२०२३ | १७/०३/२०२३ | सदनिका क्र. ए २०४, दुसरा मजला,बि.नं.४ सुंदरम को.हौ.सो.लि. स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १३ | राहूल सहदेव कांबळे | अविनाश यादव शेळके | पवल १-३३७५-२०१६ | ७/५/२०१६ | सदनिका क्र.ई ०२, तळ मजला,प्रेरणा बिल्डींग, न्यू प्रेरणा को.हौ.सो.लि. स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स, मौजे शिलोत्तर रायचर |
| १४ | जितेश विजय पाटील | चंद्रहा वर्मा/सुमन सी. वर्मा | पवल ४-२०४-२०२४ | ३/१/२०२४ | सदनिका क्र.२:५,दुसरा मजला, बि.नं.१/२ वृंदावन रेसिडेन्शियल कॉम्प्लेक्स, फेज१, अजिंक्यतारा को.हौ.सो.मौजे पालीदेवद |
| १५ | शितल सुरेंद्र वरळीकर, सुरेंद्र अरुण वरळीकर | विष्णू भिकाजी ढोके/ स्नेहांकित विष्णू ढोके | पवल १-१८३-२०२४ | ९/१/२०२४ | सदनिका क्र.डी २०४,दुसरा मजला,डी विंग, विठोबा कॉम्प्लेक्स को.हौ.सो., मौजे पालीदेवद |
| १६ | निलेश कुमार राय/ अनु राय | रविंद्र भिमाजी कुचिक/ भिमाजी खुशाबा कुचिक | पवल ५-१३९६१-२०२१ | ८/११/२०२१ | सदनिका क्र.३०२, तिसरा मजला,ए विंग, निंबेश्वर आंगण को.हौ.सो.मौजे पालीदेवद |
| १७ | मंगल मिलींद पगारे | भगवान गजानन पाटील मयत तर्फे कायदेशीर वारस श्रीमती उषा भगवान पाटील | पवल २-१५१११-२०२२ | १/११/२०२२ | सदनिका क्र.४०३,चौथा मजला,ए विग, श्रीराम दर्शन, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १८ | प्रतिभा पांडुरंग रणदिव | मे. राम रत्न बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | पवल ३-२०१४७-२०२२ | ३०/११/२०२२ | सदनिका क्र.ई ३०२,तिसरा मजला, ए विंग, श्री वसंत विहार को.हौ.सो.मौजे शिलोत्तर रायचूर |
| १९ | संगीता रविंद्र पुरारकर | क्षितीज महेंद्र पुरारकर | पवल १-४१३-२०२४ | १७/०१/२०२४ | सदनिका क्र.३१०, तिसरा मजला, ओमकार रेसिडेन्सी, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २० | थवासीकुमार कोनार/ दक्षणादेवी कोनार | रोहिदास बबन दुंडे | पवल ३-४९५-२०१९ | ७/१/२०१९ | सदनिका क्र.ई २०१,दुसरा मजला,बि.नं.१, स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| २१ | आकाश सुभाष गमरे/ विद्या सुभाष गमरे/ सुयेश सुभाष गमरे | निलेश भगवान पाटील | पवल २-२६९२-२०२४ | ८/२/२०२४ | सदनिका क्र.३०६, तिसरा मजला,बी विंग, श्री राम दर्शन को.हौ.सो.मोजे शिलोत्तर रायचूर |
| २२ | उत्कर्ष उदय शेळके अ.पा.क. आई करिश्मा उदय शेळके | गीता सोमवार शेळके | पवल २-१३७३-२०२४ | २३/०१/२०२४ | सदनिका क्र.००४, तळ मजला, माउली दर्शन, मौजे पालीदेवद |
| २३ | उत्कर्ष उदय शेळके अ.पा.क.आई करिश्मा उदय शेळके | गीता सोमवार शेळके | पवल २-१३७८-२०२४ | २३/०१/२०२४ | सदनिका क्र.०३०५, तिसरा मजला, माउली दर्शन, मौजे पालीदेवद |
| २४ | उत्कर्ष उदय शेळके अ.पा.क.आई करिश्मा उदय शेळके | गीता सोमवार शेळके | पवल २-१३७९-२०२४ | २३/०१/२०२४ | सदनिका क्र.३०७, तिसरा मजला, माउली दर्शन, मौजे पालीदेवद |
| २५ | शरयु नारायण म्हात्रे | मे.माउली प्रसाद इंटरप्रायजेस तर्फे भागीदार निकीता महेश पाटील | पवल १-७०००-२०१६ | १४/१०/२०१६ | सदनिका क्र.१०१, पहिला मजला, दिव्या निवास, मौजे शिलोत्तर रायचूर |
| २६ | शान्तनु घोष | शान्तनु घोष/गीता घोष | दि.चौ.अर्ज क्र.१३३३/२०२२ | २१/०३/२०२३ | सदनिका क्र.सी २०१,दुसरा मजला,बि.क्र.३ कार्तिक्य पार्क को.हौ.सो.मौजे शिलोत्तर रायचूर |
| २७ | कैलास माया खंडागळे | माया जानू खंडागळे | अनुक्रमांक ३०३२/२०२३ | १५/०९/२०२३ | घर मिळकत क्र.२८, ७७/४/१०१, ७७/१०/१०७ |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# जागतिक महिला दिन उत्साहात

## नवी मुंबईत महिला मेळावा



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या संकल्पनेतून नवी मुंबईतील नेरूळ येथील तेरणा विद्यालयाच्या पटांगणात जागतिक महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यासाठी हजारो महिला सहभागी झाल्या होत्या. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या महिलांना पश्चिम बंगालमधून व्हीडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संबोधित केले.

माजी खासदार आणि ठाणे लोकसभा मतदारसंघाचे प्रभारी विनय सहस्रबुद्धे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. देशात लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देत त्यांना राजकारणात आणि पर्यायाने समाजात सक्षम करण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली भाजप सरकारने घेतला. महिलांसाठी हे असे धडाडीचे निर्णय फक्त भाजपच घेऊ शकते. त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी भाजप हा एकमेव पर्याय आहे, असे प्रतिपादन विनय सहस्रबुद्धे यांनी केले. भाजपने सातत्याने महिला सक्षमीकरणाची भूमिका घेतली असली, तरी ज्या राज्यांत बिगरभाजप सरकार आहेत, त्या राज्यांनी महिलांसाठीच्या केंद्र सरकारच्या योजना पोहचू दिल्याच नाहीत, अशी टीकाही त्यांनी या वेळी केली.

दरम्यान, जागतिक महिला मेळाव्यात काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ नगरसेविका अनिता शेट्टी यांनी आमदार मंदा म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली आणि माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजप पक्षात प्रवेश केला. त्यांच्या भाजप प्रवेशाने नवी मुंबईत काँग्रेस पक्षाला खिंडार पडले असल्याचे बोलले जात आहे.

## गव्हाण विद्यालयाच्या प्रांगणात विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये जागतिक महिला महिला दिनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. महिला दिनाच्या पूर्वसंध्येला विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या विशेष समारंभात विविध उपक्रमांनी हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम इयत्ता सातवी क च्या वर्गातर्फे साजरा करण्यात आला. यावेळी वर्गशिक्षक इ. एम. ठाकूर यांनी कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले. साईशा घोलप हिने सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक जी.सी. गोडगे तसेच उप मुख्याध्यापक पी. बी. मंडले तर संस्थेचे लाईफ मेंबर आर.एस. भोईर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बी पी पाटोळे, क्रीडा शिक्षक जे जे ठाकूर, वक्तृत्व विभाग प्रमुख एस. एस. रंधवे, सी.एम. पाटील, सी एन ठाकूर, वाय एस पाटील, डी आर वर्तक तसेच सर्व रयत सेवक आवर्जून उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते महिला संरक्षण करण्यासाठी देण्यात आलेले डेमॉन्स्ट्रेशन! या वेळी फिट इंडियातर्फे प्रशांत सर आणि अनिश सर यांनी स्व संरक्षणाचे प्रात्यक्षिक करून दाखवले.या वेळी देवकुळे मॅडम आणि जीविका पाटील यांनी उत्साहाने सहभाग दाखवला.

या वेळी रंधवे सर यांनी महिला दिनाचे महत्त्व आणि वैशिष्ट्य आणि काळाची गरज स्पष्ट केली. विद्यालयाच्या जुनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख बाबुलाल पाटोळे यांनी महिला दिनाचे महत्त्व विशद करणारे भाषण केले. वेशभूषातील विद्यार्थिनींना विशेष मार्गदर्शन विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख एच आर पाटील यांनी केले.



# तुपगाव येथील श्री शंकर मंदिराकडील रस्त्याचे भूमिपूजन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधीअंतर्गत चौक तुपगाव येथे शंकर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यासाठी अंदाजे रक्कम १४ लाख रुपये मंजूर झाले असून शुक्रवारी (दि. ८) महाशिवरात्रीनिमित्त या रस्त्याचे श्रीफळ वाढवून भूमिपूजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्य वर रायगड जिल्ह्याचे भाजपाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. खऱ्या अर्थाने तुपगाव ग्रामपंचायतीचे थेट सरपंच रवींद्र कुंभार यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात विकास निधी आणला जात असून गावातील खूप वर्षांपासून प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी सरपंच रवींद्र कुंभार व त्यांची संपूर्ण टीम अतिशय मेहनत घेत आहे व पुढील काळामध्येदेखील गावातील सर्व रस्ते काँक्रिटीकरण राहिलेले सर्व कामे मार्गी लावण्याचे ध्येय सरपंच रवींद्र कुंभार यांनी मनाशी बांधलेले आहे. यासाठी त्यांना जी मोलाची साथ लाभली आहे.



उरणचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांनी तुपगांवसाठी कोटी रुपयांचा निधी आणला आहे. पुढील काळात सुधा निधीची कमतरता पडणार नाही असे सुधा सांगितले. या वेळी सुयोग भालेकर उपसरपंच सचिन साखरे, कांता ताई नागावकर ग्रामपंचायत सदस्य गावचे पोलीस पाटील किशोरजी गुरव त्याचप्रमाणे देविदास गुरव, दिलीप साळुंखे ,मंगेश हातनोलकर, दत्तात्रय हातनोलकर, अविनाश दळवी, अल्पेश दळवी, सचिन कालेकर, देवेंद्र कुंभार संदीप गुरव, रमेश गुरव, योगेश गुरव, संतोष गावडे, चेतू कुंभार, गिरीष गुरव, स्वप्नील नगावकर, रमेश दळवी, हरिश्चंद्र भालेकर, अजित गुरव, प्रताप गुरव आदीसह मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## उरणमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

येथील उरण महिला सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था उरण या संस्थेचा यावर्षी साजरा करण्यात आलेल्या भव्य अशा मेळाव्याचे १८ वे वर्षे होते. रविवारी (दि. ३) पेन्शनर पार्क समोर साजरा झाला. कार्यक्रमास १३२४ महिलांची उपस्थिती होती.

यावर्षीच्या या भव्यदिव्य मेळावा साजरा करण्यासाठीच्या कार्यक्रमाची संकल्पना भारतीय सण... देश उत्सवांचा होती. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या सुप्रसिद्ध अभिनेत्री, लेखिका, निवेदिका, नृत्य व नाट्यदिग्दर्शका हर्षदा बोरकर, व सुजाता मराठे होत्या.

विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या तीन महिलांना सन्मानित करण्यात आले. यामध्ये सामाजिक कार्य – संगीता ढेरे, कमर्शियल वैमानिक – प्राप्ती ठाकूर, संकटकाळात सापडलेल्या महिलेस मदतीचा पुढे केलेला हात – निकिता शेवेकर आदींना गौरवण्यात आले.

या मेळाव्यात महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी महिला गृह उद्योजक विक्री कक्षही ठेवण्यात आले होते. सांस्कृतिक कार्यक्रमांतून भारतीय संस्कृतीमधून विविधतेतून एकता दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या वेळी सादर झालेले हे नृत्य अविष्कार प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे होते. सुत्रसंचालन गौरी मंत्री यांनी केले, आभार कोषाध्यक्ष प्रमिला गाडे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी नियोजनबद्ध होण्यासाठी उरण सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेच्या सभासदांनी मेहनत घेतली.



## श्रावणी शेलार यांचा देशपातळीवर सन्मान

**मुंबई : प्रतिनिधी**

भांडुप परिमंडळातील ठाणे नागरी मंडळात ठाणे–१ विभागातील किसन नगर उपविभाग येथे श्रावणी शेलार वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. त्या त्यांच्या कामात कोणत्याही पुरुष सहकाऱ्यापेक्षा कमी नाहीत. केंद्रीय विद्युत प्राधिकरण तर्फे आयोजित लाइनमेन दिवस २०२४ महाराष्ट्र राज्यातील महावितरण कंपनीतील प्रादेशिक कार्यालय कोकण विभागामधील इंडियन पॉवर सेक्टरमध्ये मोलाचे योगदान दिल्याबद्दल त्यांना उत्कृष्ट लाईनमन म्हणून इंडिया हॅबिटेट सेंटर दिल्ली येथे प्रशस्तीपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले.

या त्यांच्या यशाबद्दल मुख्य अभियंता भांडूप परिमंडल सुनील काकडे यांनी त्यांचे अभिनंदन केले व ठाणे मंडलात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात त्यांचे सत्कार केले. या वेळी ठाणे मंडळाचे अधीक्षक अभियंतायुवराज मेश्राम व ठाणे–१ विभागाचे कार्यकारी अभियंता चंद्रमणी मेश्राम प्रामुख्याने उपस्थित होते.


# अलट सेतू पर्यावरणपुरक

**मुंबईला भारताच्या मुख्य भूभागाशी जोडणारे अंतर कमी करणारा आणि प्रवासाच्या वेळेत बचत करणारा अटलबिहारी वाजपेयी शिवडी–न्हावाशेवा अटल सेतू १२ जानेवारीपासून खुला झाला. मुंबईसह परिसराची सर्वांगीण उन्नती साधणारा, प्रवाशांच्या सुरक्षेची काळजी घेणारा आणि मुंबई शहराच्या चौफेर विस्तारासाठी सहाय्यभूत ठरणारा हा सेतू विकासाची गॅरंटी दर्शवत आहे. दै. रामप्रहरच्या वाचकांसाठी या अटल सेतूबाबतची सविस्तर माहिती देणारी लेखांची मालिका.**

### विकासाची गॅरंटी

अटल सेतू उभारताना पर्यावरणाचा समतोल विचार करण्यात आला आहे. या क्षेत्रात स्थलांतरीत पक्ष्यांचा विशेषत: फ्लेमिंगोंचा नैसर्गिक अधिवास असल्याने प्रकल्पाच्या समुद्रातील भागात खारफुटी व दलदल इत्यादी पर्यावरणीय वैशिष्ट्यांना कमीत कमी नुकसान होईल याची दक्षता एमएमआरडीएने घेतली आहे. सुरक्षेची बाब लक्षात घेऊन बंद पडलेली वाहने नेण्यासाठी स्वतंत्र आपत्कालीन मार्गिका, ॲण्टी–क्रॅश बॅरियर्स असलेली कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ट्रॅफिक मॉनिटरिंग सिस्टिम, तसेच पक्ष्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये ध्वनी अडथळे (साऊंड बॅरिअर्स) लावण्यात आली आहेत. भूकंप, चक्रीवादळ, वाऱ्याचा दाब आणि भरती–ओहोटीच्या प्रभावामध्ये टिकून राहण्यासाठी या प्रकल्पास सक्षम बनविण्यात आले असून सागरी सेतूचे घटक पुढील १०० वर्षांपर्यंत टिकून राहण्यासाठी गंजरोधक सामग्रीपासून बनवलेले आहेत.

अटल सेतू बनविणे अतिशय आव्हानात्मक काम होते. यासाठी अत्याधुनिक जपानी तंत्रज्ञानाचा वापर करून हा अद्वितीय पूल बांधण्यात आला. एका बाजूला मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि दुसऱ्या बाजूला जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण असलेल्या मुंबई खाडीमध्ये हा पूल उभारण्यात आला आहे. कंटेनर वाहून नेणारी मोठी जहाजे तसेच मासेमारीच्या बोटी येथून सतत ये–जा करीत असतात. त्यांची वाहतूक सुरळीत व्हावी याबरोबरच कच्च्या तेलाची वाहतूक करणाऱ्या समुद्राखालील वाहिन्या, भाभा अणुसंशोधन केंद्र आणि बीपीसीएलच्या तेल टर्मिनल्सची सुरक्षितता आदी बाबी लक्षात घेऊन या व्ह्यू बॅरिअर्सचे नियोजन करण्यात आले आहे. मुंबई बेटाच्या भौगोलिक मर्यादांमुळे शहरातील जमिनीच्या टंचाईची समस्या संपुष्टात येऊन अद्याप उपनगरी रेल्वेवर अवलंबून असल्यामुळे प्रामुख्याने उत्तर–दक्षिण विस्तारलेल्या मुंबई शहराच्या चौफेर विस्तारासाठी हा प्रकल्प सहाय्यभूत ठरणार आहे. या परिसरात दहा विकास केंद्र उभारण्यात येणार आहेत. सुवर्णमहोत्सवी वर्षात प्रवेश करणारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुंबई परिसरातील नागरिकांना विकासाच्या नवनवीन संधी उपलब्ध करून देत असून अटल सेतूच्या रूपाने प्राधिकरणाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील सर्वांत लांब व जगातील १०व्या क्रमाकांच्या लांबीच्या सागरी मार्गाचे लोकार्पण केले. समुद्रावर बनवलेला हा देशातील सर्वांत लांब पूल आहे. हा पूल दक्षिण मुंबईतून नवी मुंबईत पोहचण्यासाठी केवळ २० मिनिटांचा वेळ घेईल. यापूर्वी हे अंतर दोन तासांचे होते. अटल सेतू जवळपास २१.८ किलोमीटर लांबीचा व सहा पदरी समुद्री पूल आहे. याची लांबी समुद्रात साडे १६ किलोमीटर तर जमिनीवर ५ किलोमीटर आहे. या पुलासाठी १७,८४० कोटींहून अधिक खर्च झाला आहे. वेळेची आणि इंधनाची बचत होणार असल्याने या प्रकल्पामुळे तिसरी मुंबई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात मोठे उद्योग, विकासात्मक प्रकल्प येऊन आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक असा सर्वांगीण आणि शाश्वत विकास होण्यास मदत होणार आहे. यामुळे या भागातील पर्यटनालादेखील अधिक चालना मिळेल. अर्थव्यवस्थेला मिळणाऱ्या अपेक्षित चालनेमुळे तसेच नव्याने होणाऱ्या रोजगार निर्मितीमुळे हा प्रकल्प 'गेम चेंजर' ठरणार आहे, यात शंका नाही.

अटल सेतूमुळे पनवेल–मुंबई अंतर जवळ आले. वेळ कमी लागतो. रेल्वेच्या गर्दीचा त्रास वाचला हे खूप चांगलेच आहे, पण त्यामुळे आता पनवेलला राहण्यासाठी गर्दी होईल. शहरात वाहतुकीच्या समस्या निर्माण होतील. त्यामुळे आम्हा पनवेलकरांना आजपर्यंत मिळणारी शांतता मात्र धोक्यात येणार आहे, असे शैलेश शृंगारपुरे यांनी सांगितले. **(क्रमश:)**

**-नितीन देशमुख**

## पनवेलमध्ये 'आर्टिकल ३७०'चा मोफत शो

### नवमतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षातर्फे नवमतदारांसाठी आर्टिकल ३७० या चित्रपटाच्या मोफत शोचे गुरुवारी (दि. ७) करण्यात आले होते. या उपक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.

देश आणि देशभक्ती या अनुषंगाने काश्मीरवर आधारित आर्टिकल ३७० या सत्य घटनेवर आधारित चित्रपटाचा शो १८ ते २५ वयोगटातील नवमतदारांसाठी पनवेलमध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने पनवेलमधील ओरियन मॉलमधील पीव्हीआर सिनेमागृहात गुरुवारी आयोजित केला होता. या उपक्रमाला नवमतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी ज्येष्ठनेते वाय.टी.देशमुख, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, अर्चना ठाकूर, माजी नगरसेवक समीर ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, महिला मोर्चा शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, संजय जैन, युवामोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतीक सेलेच अभिषेक पटवर्धन, अभिषेक भोपी, प्रभाग क्रमांक १९ अध्यक्ष पवन सोनी, युवामोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, रोहीत जगताप, देवांशू प्रभाळे, वैभव बुवा, आदित्य ठाकूर, आदेश ठाकूर यांच्यासह मान्यवर या वेळी उपस्थित होते.



## सनातनतर्फे ग्रंथप्रदर्शनाच्या माध्यमातून अध्यात्मप्रसार



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

'महाशिवरात्री'ला शिवतत्त्व नेहमीच्या तुलनेत एक हजार पटीने कार्यरत असते. या दिवशी शिवाची उपासना जेवढी अधिक करू, तेवढा उपासकाला आध्यात्मिक स्तरावर अधिक लाभ होतो. या अनुषंगाने शिवाच्या उपासनेसह विविध विषयांवर भाविकांना शास्त्रीय माहिती मिळावी, यासाठी सनातन संस्थेच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त सनातन संस्थेच्या वतीने ग्रंथप्रदर्शनाच्या माध्यमातून अध्यात्मप्रसार करण्यात आला. नवी मुंबई आणि पनवेल येथे महाशिवरात्रीच्या निमित्ताने भगवान शंकराच्या मंदिराच्या परिसरात सनातन संस्थेच्या वतीने ४० ठिकाणी ग्रंथप्रदर्शने लावण्यात आली होती. या सर्व ग्रंथप्रदर्शनांना हजारो जिज्ञासूंनी भेट देऊन सनातनचे विविधांगी ग्रंथ आणि सनातनची सात्त्विक उत्पादने घेतली.

या सर्व ग्रंथप्रदर्शनांना भेट देणारे विविध मान्यवर जिज्ञासू आणि भाविक यांनी सनातन संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेले अध्यात्म, साधना, देवतांची उपासना, धर्माचरण, राष्ट्ररक्षण, धर्मजागृती, आपत्काळविषयीची सिद्धता आयुर्वेद, आरोग्य आदी विषयांवरील ग्रंथमालिकेतील ग्रंथ आणि सात्विक उत्पादने घेतली. पनवेल येथील श्री गाडेश्वर मंदिरातील ग्रंथप्रदर्शनाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील सोबत होते. सानपाडा येथील सनातनच्या ग्रंथपदर्शनाला नवी मुंबईचे भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी भेट दिली. सनातनच्या अनेक ग्रंथपदर्शनांवर या वेळी अनेक जिज्ञासूंनी साधना, वास्तूशुद्धी आदी विषयांवर शंकानिरसनही करून घेतले, तसेच दैनंदिन जीवनात धर्माचरण आणि साधेनसाठी करावयाचे प्रयत्न आणि कृती सुद्धा काही जिज्ञासूंनी समजून घेतल्या.



**नवीन पनवेल : महाशिवरात्री दिनाचे औचित्य साधून, प्रवाशांच्या मागणीनुसार ए टाईप सेक्टर १३ दत्त मंदिर येथे (आरटीओ मान्यताप्राप्त) रिक्षा नाक्याचे उद्घाटन वंदे मातरम संघटनेचे अध्यक्ष रवी नाईक यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रमुख सल्लागार प्रा. महादेव इंगळे, नाका प्रमुख महादेव नेरकर, उपनाका प्रमुख सुदाम जाधव, खजिनदार नरेश पाटील, भाई गरुडे, भोपी, प्रताप मरगज, स्थानिक रहिवाशी उपस्थित होते.**

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने महायुतीचे सरकार कार्यरत -खासदार सुनील तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

३५० वर्षांपूर्वी शिवराज्याभिषेक सोहळा या रायगडावर झाला. रायगडच्या भूमीचा विचार दैदिप्यमान आहे. आम्ही भाग्यवान आहोत छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमित आम्ही जन्माला आलो. आज तो आम्ही दैदिप्यमान इतिहास महारांगोळीच्या माध्यमातून साकारला गेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा घेत महायुतीचा सरकार काम करीत आहेत, असे खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादी काँग्रेस व सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित भव्य विश्वविक्रमी महारांगोळी, ३५० शिवज्योतींच्या झोतात लोकार्पण सोहळा भुवनेश्वर येथील मैदानात झाला त्या वेळी ते बोलत होते. या वेळी महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, महिला आयोग अध्यक्ष रुपाली चाकणकर, युवक अध्यक्ष सुरज चव्हाण, अल्पसंख्याक अध्यक्ष नाईकवाडी, प्रदेश अध्यक्ष युवक प्रशांत कदम, प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, वरदा तटकरे, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, महिला तालुकाध्यक्ष प्रितम पाटील, शहर अध्यक्ष अमित उकडे, महिला अध्यक्षा प्राजक्ता चव्हाण, पुजा पोटफोडे, शिल्पा धोत्रे, महेश कोलटकर, महेंद्र गुजर, शंकरराव भगत, अनिल भगत, सरपंच अमित मोहीते, शांतीशील तांबे, नरेश पाटील, रामाशेठ म्हात्रे आदी उपस्थित होते.



अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी, रायगडच्या भूमीत शिवरायांचा विचारांचा वारसा जागवल्याने त्याचा आम्हाला अभिमान वाटतो. छत्रपती शिवरायांचा विचार राष्ट्रवादी पक्ष पुढे घेऊन जात आहे. शेतकरी योजना, गाईच्या दुधाला अनुदान, पिक विमा यासह विविध स्मारकाला निधी दिले आहे. लेक लाडकी योजनाच्या माध्यमातून महिला सबलीकरण करण्यात येत. शाहु, फुले, आंबेडकर यांचे विचार रुजविण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत, असे सांगितले.

आमदार अनिकेत तटकरे यांनी, उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून तीन दिवसांत शिवराज्याभिषेक महारांगोळी ऑल इज वेलच्या कलाकारांनी साकारली आहे. पुढच्या वर्षी यापेक्षा मोठी रांगोळी साकरण्याचा प्रयत्न करणार आहे, असे सांगितले.

**विविध कार्यक्रमांची रेलचेल**

७२ तासात एक लाख २४ स्क्वेअर फूट जागेत शिवराज्याभिषेक महारांगोळी ऑल इज वेलच्या कालाकारांनी साकारली. शाहीर प्रसाद विभुते, शस्त्र प्रदर्शन करणारे किशोर चावरेकर, रायगड ज्योत आणणारे, घेरासुरगड ज्योत आणणारे, विश्वविक्रमी महारांगोळी साकारणारे, महेशस्वामी जंगम, संजय बामुगडे यांच्यासह त्यांचे ऑल इज वेलच्या टीमचे मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# चौकमध्ये आज महिलांसाठी महाआरोग्य शिबिर

**चौक :** महिला दिनानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत चौक यांच्या वतीने महाआरोग्य शिबिराचे व खेळ रंगला पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन केले असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच रितु ठोंबरे यांनी केले आहे. ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे शनिवारी (दि. ९) सकाळी नऊ वाजता सर्व प्रकारच्या मोफत तपासणी व मोफत औषधे देण्यात येणार आहेत. पिवळे व केशरी रेशनकार्ड धारकांना मोफत अँजिओपलास्टी व बायपास शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. इर्शाळवाडी कॅम्प येथे खेळ रंगला पैठणीचा कार्यक्रमांतर्गत सिने नाट्य सेलिब्रिटींच्या उपस्थितीत विविध खेळ, अनेक पारितोषिक वितरण करण्यात येणार आहेत.


**MAHATRANSCO**

## E- Tender NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost | Submission date |
|---|---|---|---|---|
| 2 | e-Tender-26/23-24/70000029689 | Work of anticorrosive coating & Painting of various ICTs Units and Transformers BY APPLYING ONE COAT OF RED OXIDE (Asian make) AND TWO COATS OF Asian make synthetic Enamel paint of light gray grade 631 at 400 kV Nagothane S/S under 400 KV R.S. (O&M) Division Nagothane..**1st Ext..** | **Rs. 22,49,540.37/-** | **14.02.2024 up to 23.59 hrs** |

**EMD 1% of Estimate cost &** Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in** Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**



## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग पिन कोड – ४०२ २०१**

ई–मेल पत्ता :– alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :– (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई- निविदा सूचना क्र. ६२ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून (जे निविदेत असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करतील त्यांचे कडून) / नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | Strengthening and black topping with protection wall on sh-87 to Ruishet Bhomoli Approach Road VR-116 km 0/00 to 4/00 in Tal Alibag Dist. Raigad | 3,41,32,711/- |
| २) | Construction of High-level Major Bridge across Amba River Connecting NH- 66 and SH-87 On Bense Bandar to Koleti approaches and Land acquisition VR-3 in tal Pen Dist. Raigad | 13,06,69,732/- |
| ३) | Construction of Major Bridge on Antora to Sapoli Road on Bhogawati River in Tal. Pen Dist. Raigad. | 7,51,51,467/- |

**ई–निविदा उपलब्ध कालावधी** :– दिनांक ४.०३.२०२४ (स.१०.००) ते दिनांक १८.०३.२०२४ (सं.१८.००)

**निविदापुर्व बैठक :** :– मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दि. ०७.०३.२०२४ रोजी दु. ३.०० वाजता

**ई–निविदा उघडणे** :– दिनांक २१.०३.२०२४ (दु.३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ,कोकणभवन, नवी मुंबई)

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ ११४१/२०२४**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, अलिबाग–४०२ २०१**
**दिनांक :– २६/०२/२०२४**

**सही/–**
**(ज.ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग,
अलिबाग, जि.रायगड


# महिला दिनानिमित्त महिला डॉक्टरांचा सन्मान

**पेण : प्रतिनिधी**

महिला दिनाचे औचित्य साधून पेण उपजिल्हा रुग्णालय व तालुक्यातील महिला डॉक्टर, परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांचा सत्कार पंचायत समिती येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा खेडेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी शुभेच्छा देताना डॉ. अपर्णा खेडेकर यांनी सांगितले की, स्त्रियांनी एकमेकांचा आदर करावा आणि त्यांना पुढे जाण्यास पाठिंबा द्यायला हवा. डॉ. नेत्रा पाटील, डॉ. मीनल मोकल. डॉ. सरिता गायकवाड, आयुष्य विभागाच्या खुशबू अग्रवाल, कर्मचारी शिल्पा पाटील, रश्मी जोशी, परिचारिका सुनीता पाटील आदींसह महिला उपस्थित होत्या.



# माणगाव शंकर मंदिर परिसर सुशोभीकरण कामाचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

आमदार भरत गोगावले यांच्या सहकार्याने व शिवसेना नेते अ‍ॅड. राजीव साबळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार व वार्डातील नगरसेवक दिनेश रातवडकर यांच्या पाठपुराव्याने २५ लक्ष निधीतून साकारलेल्या जुने माणगाव शंकर मंदिर परिसराच्या सुशोभीकरण कामाचे उद्घाटन शुक्रवारी (दि.८) करण्यात आले.



या वेळी आमदार गोगावले यांनी महाशिवरात्रीनिमित्त शंकर मंदिरात दर्शन घेतले. आमदार गोगावले यांचे व उपस्थित मान्यवरांचे देवस्थान ट्रस्टतर्फे अध्यक्ष संजय साबळे यांनी स्वागत केले. उद्घाटन कार्यक्रमास शिवसेना नेते अ‍ॅड. राजीव साबळे, दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, भाजपच्या पंचायतराज व ग्रामविकास कोकण विभाग संयोजिका शर्मिला सत्वे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख अ‍ॅड. महेंद्र मानकर, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, पं. स. माजी सभापती सुजित शिंदे, स्वछता व आरोग्य समिती सभापती शर्मिला सुर्वे, वार्डातील नगरसेवक दिनेश रातवडकर, कपिल गायकवाड, सचिन बोंबले, नगरसेविका रिया उभारे, लक्ष्मी हिलम, माजी नगर सेवक नितीन बामगुडे, शहर प्रमुख सुनील पवार, नंदिनी जाधव, प्रसाद धारिया, मस्जिद मोहल्ला अध्यक्ष अब्दुल रहिमान हाजिते उपस्थित होते.

# तांबाटी ग्रामपंचायतीतर्फे महिला दिनी विविध कार्यक्रम

**चौक : प्रतिनिधी**

महिला दिनाचे औचित्य साधून ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनी महिलांसाठी विशेष कृती शिबिराचे, व्याख्यान मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.

पुणे येथील आसरा फाउंडेशनच्या प्रमुख अर्चना मोरे यांनी माझी वसुंधरा हा प्रत्येक नागरिकांशी वैयक्तिक पातळीवर संपर्क साधण्यासाठी पर्यावरण व वातावरणातील बदल, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन साधण्यासाठी, त्याचप्रमाणे शून्य कचरा व्यवस्थापन व प्लास्टिक निर्मूलन करण्यासाठी आवश्यक माहिती दिली.



या कार्यक्रमास ग्रुप ग्रामपंचायत तांबाटीचे सरपंच अविनाश शंकर आमले, उपसरपंच शीतल पाटील, सदस्य संतोष दळवी, हरिभाऊ जाधव, सुरेश पवार, नितीन कदम, रितेश मोरे, महिला सदस्य सुगंधा जाधव, अरुणा सावंत, अस्मिता कदम, प्राजक्ता पाटील, कविता मिरकुटे, तसेच ग्रामस्थ व महिला वर्ग उपस्थित होता.

ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी हद्दीतील वनवठे येथील दिशा निलेश कदम हिने मध्य प्रदेश शासन संस्कृती विभागामार्फत खजुराहो नृत्य समारंभात आयोजित नृत्य स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन कथ्थक नृत्य केले. त्या नृत्याची गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद घेण्यात आली. त्यामुळे ग्रुप ग्रामपंचायत तांबाटीमार्फत आयोजित केलेल्या जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमांमध्ये सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

दरम्यान, ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी हद्दीतील महिलांचे विविध उपक्रम व खेळांची स्पर्धा घेण्यात आली व स्पर्धेमध्ये विजेत्या महिलांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

ग्रामसेवक प्रशांत कदम यांनी कार्यक्रमाचे आयोजन सर्वांच्या सहकार्याने केले.

# डॉ. सादिका नवाब आणि वामन दिघे यांना पुरस्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

कोमसाप, खोपोली शाखेतर्फे दिला जाणारा कै.र.वा.दिघे साहित्य पुरस्कार यावर्षी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या साहित्यिक डॉ. सादिका नवाब (सहर) व वामन रघुनाथ दिघे यांना जाहीर झाला आहे. संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला दिघे यांनी ही घोषणा केली.

सादिका नवाब (सहर) यांच्या राजदेव की अमराई या उर्दू कादंबरीस यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे, तसेच वामनराव दिघे यांनी थोर साहित्यिक कै. र.वा. दिघे यांची साहित्यिक वाटचाल, चरित्र साहित्य शिल्प या पुस्तकाद्वारे लोकांसमोर मांडले. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

# सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

महिला दिननिमित्त अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजच्या महिला विकास कक्ष, राष्ट्रीय सेवा योजना, डीएलएलई, सांस्कृतिक विभाग, अंतर्गत विभाग कक्ष, क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विहूर येथील आदिवासी वस्तीत महिलांना सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000030407** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-73/ 2023-2024.** RFx e-tender for AMC for Repair/Service/ Overhauling/Problem attending of Compressor of 245/145 kV Circuit Breaker at various substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 10,00,000/-, EMD amount Rs. 10,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **11.03.2024, 18:00 Hrs. to 18.03.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 18.03.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **19.03.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**



## महाराष्ट्र शासन

**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)**
**मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड ४०२३०१**
**Email :- rpdmahad.ee@mahapwd.com Ph.No. 02145 222243**
**NOTICE INVITING e-TENDER**
**Notice No. 12 for 2023-24**

कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक), मार्ग प्रकल्प विभाग महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडून **बी–१** नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड रायगड किल्ला सेल, मार्ग प्रकल्प विभाग महाड यांनी राखून ठेवला आहे.

| ई–निविदा काम क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई–निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | मौजे पुनाडेवाडी येथिल काळभैरव मंदिराचे जतन व संवर्धन करणे, ता. महाड, जि. रायगड. | ८४५१८०३/– | ८५०००/– | ६ महिने | ११८०/– | वर्ग ४ अ व वरील |
| २. | मौजे वारंगी गावदेवी मंदिराकडे जाणा–या रस्त्याचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड. | ५३३६९८२/– | ५४०००/– | ६ महिने | ११८०/– | वर्ग ४ अ व वरील |
| ३. | मौजे वाळसुरे येथे साकव बांधणे ता. महाड, जि. रायगड. | ५०४८८७४/– | ५१०००/– | ६ महिने | ११८०/– | वर्ग ४ अ व वरील |
| ४. | मौजे वारंगी येथे अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड. | ४९६९८११/– | ५००००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ५ व वरील |
| ५. | मौजे खलई तालुका महाड येथे अतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड. | ४९५७२५७/– | ५००००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ५ व वरील |
| ६. | मौजे खलई येथे पादचारी पुलाचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड. | ४९४१४०६/– | ५००००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ५ व वरील |
| ७. | मौजे करमर तालुका महाड येथे अंतर्गत रस्ता व संरक्षक भितीचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड. | ४०६९१७७/– | ४१०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ५ व वरील |
| ८. | मौजे वाघोली येथे अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड. | ३२८७५७९/– | ३३०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ५ व वरील |
| ९. | मौजे दापोली येथिल स्मशानभुमीकडे जाणा–या रस्त्याचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड. | ३२३६१६०/– | ३३०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ५ व वरील |
| १०. | सांदोशी येथे अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड. | २८९६५८६/– | २९०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ५ अ व वरील |
| ११. | मौजे पणदेरी कोंड येथे रस्त्याचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड. | २०६००६४/– | २१०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ५ अ व वरील |
| १२. | मौजे वारंगी येथिल शिवकालीन मंदिराचे जतन व संवर्धन करणे, ता. महाड, जि. रायगड, | १६५८५५१/– | १७०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ६ व वरील |
| १३. | मौजे हिरकणीवाडी येथे अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि.रायगड. | १६२२८९१/– | १७०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ६ व वरील |
| १४. | मौजे टकमकवाडी येथे अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | १२५२३०७/– | १३०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ६ व वरील |
| १५. | मौजे रायगडवाडी येथे अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | १२५२३०७/– | १३०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ६ व वरील |
| १६. | मौजे नेवाळीवाडी येथे अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | १२५२३०७/– | १३०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ६ व वरील |
| १७ . | मौजे आमडोशी धनगरवाडी स्मशानभुमीकडे जाणा–या रस्त्याचे बांधकाम करणे, ता. महाड, जि.रायगड. | १२०२३३८/– | १३०००/– | ६ महिने | ५९०/– | वर्ग ६ व वरील |

### ई निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक | दि. **०१/०३/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दि. **०८/०३/२०२४,** (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | मा.कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, महाड, यांचे कार्यालयात दि. **११/०३/२०२४** वेळ ११.०० पासून |

**टिप :–** परिपूर्ण निविदा **https//mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेतस्थळावरच पाहता येतील.

**सही/–**
**(महेश रा. नामदे)**
कार्यकारी अभियंता
(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
मार्ग प्रकल्प विभाग, महाड, जिल्हा रायगड

**रा.कि.सेल/माप्रवि/महाड/निविदा/६६**
**दिनांक : २८/०२/२०२४**

# भारत दमदार फलंदाजीने आघाडीवर

## दुसऱ्या दिवसाअखेर ४५० पार



**धरमशाला : वृत्तसंस्था**

भारताने पाचव्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (दि.८) दमदार फलंदाजी करीत इंग्लंडविरूद्ध मोठी आघाडी घेण्यास सुरुवात केली आहे. भारताने दिवसअखेर ८ बाद ४७३ धावा केल्या असून २५५ धावांची आघाडी घेतली आहे. भारताकडून दोन शतके आणि दोन अर्धशतके झाली. रोहित शर्माने १०३ तर शुभमन गिलने ११० धावांची शतकी खेळी केली. त्यानंतर सर्फराजने ५६ आणि पदार्पण करणाऱ्या पडिक्कलने ६५ धावा करत मोठी भागीदारी रचली.

इंग्लंड सामन्यात जोरदार पुनरागमन करणार असे वाटत असतानाच जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादवने नवव्या विकेटसाठी ४५ धावांची भागीदारी रचली. रोहित शर्माने १०३ तर शुभमन गिलने ११० धावांची शतकी खेळी केली असून सर्फराजने देखील आपले अर्धशतक पूर्ण केले आहे. दिवसाच्या पहिल्या सत्रात भारताने एकही विकेट न गमावता १३५ धावा केल्या होत्या. रोहित आणि शुभमन गिलने दुसऱ्या विकेटसाठी १७१ धावांची भागीदारी रचली.

पहिल्या सत्रात निर्विवाद वर्चस्व गाजवल्यानंतर दुसऱ्या सत्राच्या सुरूवातीलाच भारताला पाठोपाठ दोन धक्के बसले. बेन स्टोक्सने रोहित शर्माला आणि मार्क वूडने शुभमन गिलला बाद केले. पाठोपाठच्या दोन धक्क्यानंतर सर्फराज खानने सावध तर पडिक्कलने आक्रमक फलंदाजी करत भारताचा डाव सावरला. या दोघांनी भारताला ३५० पार पोहचवले आहे. या दोघांनीही अर्धशतकी खेळी केली. सर्फराजने ६० चेंडूत ५६ धावा केल्या तर पडिक्कलने १०३ चेंडूत ६५ धावांची अर्धशतकी खेळी केली.

पडिक्कलचे हे पदार्पणाच्या सामन्यातील अर्धशतक होते, मात्र हे दोघे बाद झाल्यानंतर भारताचा डाव घसरला.

दुसरा दिवस संपण्यासाठी काही षटके शिल्लक असतानाच जडेजा आणि जुरेल प्रत्येकी १५ धावा करून बाद झाला. त्यानंतर अश्विनही शुन्यावर बाद झाला. भारताची अवस्था ४ बाद ४२७पासून ८ बाद ४२८ अशी झाली. अखेर भारताची ही पडझड कुलदीप यादव आणि जसप्रीत बुमराह यांनी रोखली. या दोघांनी फक्त विकेट टिकवटून ठेवली नाही तर ४५ धावांची भागीदारी रचत संघाला ४७३ धावांपर्यंत देखील पोहचवले. दिवसाच्या शेवटी भारताकडे २५५ धावांची आघाडी झाली आहे. कुलदीप २७ तर बुमराह १९ धावा करून नाबाद आहे.

# देवदत्त पडिक्कलचे पदार्पणात अर्धशतक

**कर्नाटक : वृत्तसंस्था**

भारताचा युवा फलंदाज देवदत्त पडिक्कलला इंग्लंडविरूद्धच्या पाचव्या कसोटीसाठी पदार्पणाची संधी मिळाली. या संधीचा फायदा उचलत पडिक्कलने पदार्पणाच्या सामन्यातच गगनचुंबी षटकार लगावत शानदार अर्धशतक झळकावले आहे. या डावखुऱ्या युवा फलंदाजाने ८४ चेंडूंत ८ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५२ धावा केल्या. पडिक्कलने त्याच्या इनिंगच्या सुरुवातीलाच अँडरसनच्या गोलंदाजीवर ५ चौकार लगावले. १००वा कसोटी सामना खेळत असलेल्या आर अश्विनने पडिक्कलला कसोटी कॅप दिली, पण भारतासाठी कसोटी पदार्पण करणाऱ्या पडिक्कलने आजारांचा सामना करीत हा खडतर प्रवास करीत पार केला.

रणजी करंडक स्पर्धेत कर्नाटकच्या या खेळाडूला केएल राहुलला दुखापत झाल्यानंतर त्याचा बदली खेळाडू म्हणून संघात सामील केले. मोठ्या प्रतिक्षेनंतर पडिक्कलला दुखापतग्रस्त रजत पाटीदारच्या जागी पदार्पणाची संधी मिळाली, पण इथपर्यंत पोहोचण्याचा त्याचा हा प्रवास खूपच त्रासांनी भरलेला होता. त्याला काही

### आजारपणानंतर रणजीमधील कामगिरीने उजळले नशीब



आजारांना सामोरे जावे लागले होते.

नो बॉलवरून रोहित शर्माचा जडेजाला टोमणा, लाईव्ह सामन्यात म्हणाला अरे यार आयपीएलमध्ये तर पडिक्कल हा २०२२मध्ये काही महिने हॉस्पिटलमध्ये होता. या आजारपणामुळे त्याचे काही किलो वजन कमी झाले आणि अखेरीस त्याला संघर्ष करावा लागला. गेल्या वर्षीच्या आयपीएलनंतर राजस्थान रॉयल्सकडून त्याला लखनौ सुपर जायंट्सने ट्रेड केले. २०२१ ते २०२१ या काळात पडिक्कल फिट राहण्यासाठी खूप संघर्ष करीत होता. पोटाच्या आजाराने तो सतत त्रस्त होता.

पडिक्कलने २०२४च्या रणजी करंडक स्पर्धेत अद्वितीय कामगिरी केली आणि त्याच्या या शानदार कामगिरीची दखलही घेण्यात आली. या २३ वर्षीय डावखुऱ्या फलंदाजाने सहा डावांत ९२.६६च्या सरासरीने ५५६ धावा केल्या आहेत. पंजाबविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात त्याने सर्वाधिक १९३ धावांसह तीन शतके झळकावली आहेत. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर तामिळनाडूविरुद्धची १५१ धावांच्या खेळीने पडिक्कलने निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले. निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्यासमोरच डावखुऱ्या फलंदाजाने रणजी करंडकातील तिसरे शतक झळकावले. अलिकडील रणजी सामन्यांपूर्वी त्याने अहमदाबाद येथे भारत अ साठी ६५, २१ आणि १०५ धावांच्या इनिंगने प्रभावित केले आहे. गेल्या काही मोसमात त्याच्या खेळात जे सातत्य नव्हते ते त्याने परत मिळवत दमदार कामगिरी केली.

# दिनेश कार्तिक आयपीएल २०२४नंतर होणार निवृत्त

**मुंबई : प्रतिनिधी**



आयपीएलमधील सर्वात धोकादायक फिनिशरपैकी एक असलेल्या यष्टीरक्षक फलंदाज दिनेश कार्तिकने निवृत्तीच्या बातम्यांदरम्यान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला आणखी एक मोठा धक्का दिला आहे. दिनेश कार्तिक आयपीएल २०२४ नंतर क्रिकेटमधून निवृत्त होणार आहे, परंतु आता तो आरसीबीच्या सलामीच्या सामन्यातही मैदानात उतरणार नाही. कार्तिक दुखापतीमुळे किमान दोन सामन्यांतून बाहेर असेल.

दिनेश कार्तिक हा २००८ च्या पहिल्या आयपीएल हंगामापासून खेळतोय. धोनीप्रमाणे तो देखील सर्वात जुना आयपीएल खेळाडू आहे. तो आतापर्यंतच्या १६ हंगामात फक्त दोन सामन्यात खेळला नव्हता. बीसीसीआयच्या सूत्राने दिलेल्या माहितीनुसार दिनेश कार्तिकचे खझङ २०२४ हे शेवटचे आयपीएल सत्र असणार आहे. या आयपीएल हंगामानंतर दिनेश कार्तिक आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेईल.

दिनेश कार्तिक आतापर्यंत ६ आयपीएल फ्रेंचायजींकडून आयपीएल खेळला आहे. तो २००८ ते २०११ पर्यंत दिल्ली डेअरडेव्हिल्सकडून खेळला. त्यानंतर २०१२ पर्यंत किंग्ज इलेव्हन पंजाब आणि १३पर्यंत मुंबई इंडियन्सकडून खेळला. २०१४मध्ये तो पुन्हा दिल्ली कॅपिटल्सकडे गेला. एका हंगामानंतर त्याने २०१५ मध्ये आरसीबीचा रस्ता धरला, मात्र तिथेही कार्तिक एक हंगामच टिकला. २०१६-१७ गुजरात लायन्समध्ये काढल्यानंतर त्याने केकेआरचा संघ जवळ केला. तेथे तो कर्णधारदेखील होता.

# महाराष्ट्रातील वेगवान गोलंदाजांसाठी सुवर्णसंधी

**जळगाव** : महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने महाराष्ट्रातील वेगवान गोलंदाजांचा शोध घेण्यासाठी 'महा स्पीडस्टार : शोध महा वेगाचा' ही शोध मोहीम हाती घेतली आहे. ९ ते ३१ मार्चदरम्यान राज्यातील पाच ठिकाणी होणाऱ्या या शोध मोहिमेत सहभाग घेऊन कौशल्य दाखविण्याची संधी आहे.

स्पर्धेसाठी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अधिकृत वेबसाईटवर www.cricketmaharashtra.com जाऊन नोंदणी करणे आवश्यक असून समिती नियुक्त करण्यात आली आहे. ९ व १० मार्चला नाशिक गोल्फ क्लब ग्राउंड व छत्रपती संभाजीनगर एडीसीए क्रिकेट ग्राउंड तसेच १६ व १७ मार्चला नांदेड नांदेड स्टेडियम, सोलापूर इंदिरा गांधी स्टेडियम तर २३ व २४ मार्चला पुणे गहुंजे स्टेडियम यातून महाअंतिम फेरी ही पुण्याच्या गहुंजे स्टेडियम येथे ३१ मार्चला होईल.

# विश्वकरंडक पात्रता फेरीसाठी अन्वर, जिक्सनचे संघात पुनरागमन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

फिफा विश्वकरंडक (२०२६) व एएफसी आशियाई करंडक (२०२७) या दोन्ही महत्त्वाच्या स्पर्धांच्या पात्रता फेरीतील अफगाणिस्तानविरुद्धच्या लढतींसाठी भारतीय फुटबॉल संघाची घोषणा गुरुवारी करण्यात आली.

भारताच्या संभाव्य ३५ खेळाडूंच्या नावांची यादी जाहीर करण्यात आली असून मध्य बचावफळीतील खेळाडू अन्वर अली व बचावफळीतील खेळाडू जिक्सन सिंग यांचे पुनरागमन झाले आहे. मोहन बागानचा स्टार खेळाडू अन्वर अली घोट्याला झालेल्या दुखापतीमुळे मागील वर्षी फुटबॉलपासून दूरच होता. जानेवारी महिन्यातील आशियाई करंडकातही तो खेळू शकला नाही, तसेच मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यात डाव्या खांद्यावर झालेल्या शस्त्रक्रियेमुळे जिक्सन सिंगही बाहेरच होता.

फिफा विश्वकरंडकाच्या पात्रता फेरीत भारतीय फुटबॉल संघाचा अ गटात समावेश आहे. या गटात भारतासह कतार, कुवेत व अफगाणिस्तानचा समावेश आहे. साखळी फेरीत प्रत्येक संघ उर्वरित तीन देशांशी दोन वेळा लढणार आहेत.

भारतीय संघाने कुवेतला पराभूत केले असून कतारकडून मात्र त्यांना हार पत्करावी लागली आहे. आता २१ ते २६ मार्च यादरम्यान भारतीय संघ अफगाणिस्तानशी दोन वेळा भिडणार आहे. २१ मार्च रोजी सौदी अरेबियामध्ये अफगाणिस्तानशी दोन हात केल्यानंतर २६ मार्च रोजी गुवाहाटी येथे भारतीय संघ त्यांना टक्कर देणार आहे.

साखळी फेरीत दमदार कामगिरी केल्यानंतर भारतीय संघाकडे तिसऱ्या फेरीत पोहोचून इतिहास रचण्याची संधी असणार आहे.





**पनवेल : भाजपचे मावळ मतदारसंघ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी तळोजा एमआयडीसीतील तोंडरे येथील विनस सेफ्टी कंपनीमध्ये महिला दिनानिमित्त महिला कर्मचाऱ्यांशी संवाद साधला व त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी कंपनीचे अधिकारी वर्ग उपस्थित होते.**









## वेश्वी येथे उद्या कबड्डी स्पर्धा

**अलिबाग** : जिल्हा कबड्डी असो. च्या मान्यतेने तालुक्यातील वेश्वी येथे ओमकार क्रीडा मंडळाच्या वतीने रविवारी ( दि. १०) कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धेत आमंत्रित ३२ संघांचा सहभाग असणार आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघास रुपये २१ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकास १५ हजार व चषक, तसेच तृतीय आणि चतुर्थ क्रमांकास १० हजार व चषक, वैयक्तिक बक्षीसे असणार आहेत.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com